

वर्ष १ अंक ३
अंगारमळा
जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर २०१७
☆ तत्वत: कर्जमाफीचा सरसकट गारुडीखेळ
☆ स्वामिनाथन आयोग म्हणजे शेतीसाठी भुलभुलैय्या!
मी शेतकरी....
किसान क्रांती
१ जुन पासुन संपावर
शेतकऱ्यांचा संप सफसेल फसला
शेतकरी कार्यकर्त्यांचे आंदोलन तेजस्वी
सैनिकांनी रणामध्ये कमावले अन
कद्रू सेनापतींनी तहामध्ये गमावले
स्पेशल रिपोर्ट

युगात्मा शरद जोशींवर श्रद्धा आणि विचाराबर निष्ठा असणाऱ्यांचा युगात्मा परिवार

# युगात्मा परिवार मोबाईल ॲप




* युगात्मा परिवार मोबाईल ॲप web बेस पायावर आधारीत असल्याने वापरकर्त्यांच्या मोबाईलमधील मेमरीचा उपयोग करत नाही.
* त्यामुळे हे App क्लिन करण्याची गरज नाही.
* मोबाईल Hang होणार नाही.
* युगात्मा परिवार मोबाईल ॲप गुगल प्ले स्टोअर (Google Play) उपलब्ध करून देण्यात आले आहे.
* डाउनलोड करण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा. >>>

https://play.google.com/store/apps/details?id=com.andromo.dev633912.app614211




युगात्मा परिवार मोबाईल ॲप डाऊनलोड करण्यासाठी आपल्या मोबाईलवरिल Play Store वर क्लिक करा.

सर्च मध्ये Yugatma Pariwar टाईप करा.

इन्स्टॉल करा.

## Screen Shot



# अंगारमळा


**Title Code :** MAHMAR47450

**वर्ष १ । अंक ३ । २० जुलै २०१७**

**मूल्य : रु. ५०**

**अंगारमळा** हे त्रैमासिक मालक, संपादक, मुद्रक, प्रकाशक, गंगाधर मुटे यांनी त्रिवेणी ऑफसेट वर्क्स, प्रयाग ३१२, दक्षिणामुर्ती चौक, महाल, नागपूर-४४००३२ येथे छापून, मु.पो. आर्वी छोटी, ता. हिंगणघाट, जि. वर्धा-४४२३०७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

संपादक
**गंगाधर मुटे**

अंक मांडणी
**प्रकाश बोपीनवार**

वार्षिक वर्गणी : रु. १५० केवळ



संपर्क :
**अंगारमळा**
**मु.पो. आर्वी (छोटी)**
**ता. हिंगणघाट, जि. वर्धा**
**पीन कोड - ४४२ ३०७**
Email : angarmala2016@gmail.com
Mob. 9730582004, 9730786004



**ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी :**
Angarmala
Punjab National Bank
Branch Hinganghat (Wardha)
A/c No. 0202002100027538
IFS Code : PUNB0020200


अंकातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


**Title Code :** MAHMAR47450


## अंतरंग


अनुक्रमणिका ........ १
संपादकीय ........ ३
शरद जोशी : चैतन्यदायी झंझावात ........ हेरंब कुलकर्णी ........ ४
शेतकऱ्यांचा संप सपसेल फसला ........ अंगारमळा ब्युरो ........ ८
शेतकऱ्यांचा उद्वेग आणि उद्रेक ........ सुधाकर जाधव ........ १०
संपाची वाताहत हा चुकीच्या मागण्यांचा परिणाम ........ अनिल घनवट ........ १३
शेतकरी-हिताविरुद्ध तडजोड व तत्त्वहीन माघारीचा निषेध ... शेतकरी संघटना ........ १४
शेतकऱ्यांचा संप : माघार की फूट ........ सतीष देशमुख ........ १५
स्वामिनाथन आयोग म्हणजे शेतीसाठी भुलभुलैय्या! ........ श्रीकृष्ण उमरीकर ........ १६
पापक्षालन केलेत आता अन्यायही थांबवा...! ........ सचिन मोहन चोभे ........ १८
मिथीलेपासून रावेरीपर्यंत ........ सौ. प्रज्ञा जयंत बापट ... १९
केवळ शेतकरी नव्हे, तर शेती कर्जमुक्त होणे गरजेचे आहे... गोविंद जोशी ........ २०
कपाशीवरील रस शोषण करणाऱ्या किडींची ओळख ........ श्री. व्ही.व्ही. खोबे ........ २१
कुर्णोली येथे शेतकरी युवा आघाडी शाखा फलकाचे ........ शेतकरी संघटना ........ २३
शरद जोशी भारत उत्थान कार्यक्रमानुसार चर्चेसाठी ........ श्री रामचंद्रबापू पाटील .. २४
आयुष्य मातीमध्ये मस्ती करण्यात गेले असते! ........ ॲड. प्रकाश पाटील ........ २४
शेतकरी प्रश्नावर ग्रामीण भागातून स्थलांतरित शेतकरी ........ बापुसाहेब पगारे ........ २५
मराठी साहित्याची श्रीमंती वाढवणारा मौलिक ग्रंथ ........ प्रा. हरी नरके ........ २६
कर्जमाफीचा निर्णय, योजनेचा तपशील व निकष ........ शेतकरी संघटनस ........ २८
महाराष्ट्र शासनाची कर्जमुक्तीची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची . शेतकरी संघटना ........ २९
ये तू मैदानात (कविता) ........ गंगाधर मुटे (अभय) .... ३०


❊ शेरांची निवड - राज पठाण ❊ विचार संकलन - हेरंब कुळकर्णी

# संपादकीय....

**स्वातंत्र्याचे हवामान आम्हाला मानवलेच नाही**

येत्या २४ तासात विदर्भ, मराठवाडा आणि प. महाराष्ट्रासह कुठेकुठे मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, त्यापुढील ३६ तासात हवामानामध्ये फारसा बदल संभवत नाही, अशी उद्घोषणा आकाशवाणी किंवा दूरदर्शनवर झाली तरी पावसाचे दर्शन होईलच याची खात्री देता येत नाही. कधीकधी २४ अथवा ३६ तासच काय ४८ अथवा ७२ तास उलटून जातात पण आकाशात कापसाच्या बोंडाएवढाही तुकडा दुर्बिणीने शोधूनही नजरेस पडत नाही. मात्र याउलट पुढील ४८ तासात आकाश निरभ्र राहून स्वच्छ ऊन पडेल, असा आकाशवाणी/दूरदर्शनवर व्यक्त केला गेलेला अंदाज ऐकून जर एखाद्याने आपल्या लहानग्या मुलास शेतात न्याहारी पोचवायला पाठवायचे ठरवले तर त्याला रस्त्यात पावसाने झोडपलेच समजावे, अशी स्थिती आहे. एकदा तर पावसाने दडी मारली, 'मान्सूनचे आगमन लांबले – शेतकरी चिंताग्रस्त' असा मुख्य मथळा असलेल्या वृत्तपत्राचे पार्सलच वृत्तपत्र वाटणाऱ्या पोरासहित पुरात वाहून गेले होते.

आकाशवाणी, दूरदर्शन किंवा वृत्तपत्र यांचे पाऊसविषयक अंदाज हवामानखात्याने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकावर आधारीत असतात. हवामानखात्याला वारंवार तोंडघशी पाडण्यात त्या वरुणदेवतेला काय समाधान लाभते कुणास ठाऊक; पण त्याचे विपरित परिणाम मात्र या माध्यमांना भोगावे लागतात. हवामानखाते आपल्या जागी सुरक्षित असते पण विश्वासाहार्यतेला भेगा जातात या माध्यमांच्या. त्यावर जालीम उपाय म्हणून वृत्तपत्रे पाऊसपाण्याचे अंदाज छापण्याचे टाळतात आणि दूरदर्शन व वेगवेगळे टीव्ही चॅनेल जास्तीतजास्त वेळा हवामानाच्या अंदाजाच्या मथळ्याखाली केवळ कमाल आणि किमान तापमान दर्शवून मोकळे होतात.

कदाचित याच कारणामुळे शेतकरी वर्गात जेवढे स्थान पंचांगाचे आहे, त्या तुलनेत हवामानखाते कुठेच नाही. हवामान बदलाच्या संभाव्यतेचे ढोबळमानाने का होईना पण काहीतरी आराखडे मनात गृहीत धरल्याशिवाय शेती करता येत नाही. हवामानशास्त्राचे शेतीमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेती करणारा प्रत्येक शेतकरी हा त्याच्या शेतीपुरता हवामानशास्त्रज्ञच असतो. पंचांगात पर्जन्यमानाची संभाव्यता व्यक्त केली असते ती फारच मोघम स्वरूपाची असते पण बुडत्याला काडीचा आधार या न्यायाने वर्षानुवर्षे शेतकरी या पंचांगातील हवामानाच्या अंदाजावर विश्वास ठेवून आहे. नक्षत्रानुरूप आणि नक्षत्रांच्या वाहनानुसार पाऊस पडत असतो, यावर त्याचा विश्वास आहे. नक्षत्राचे वाहन जर मोर असेल तर पाऊस थुईथुई येतो, वाहन बेडूक असेल तर भारी पाऊस येतो, वाहन गाढव असेल तर पळता पाऊस येतो किंवा वाहन जर म्हैस असेल तर पाऊस ठाण मांडून बसतो असे त्याने वर्नुषावर्षे अनुभवातून हवामानाचे दर्शन घेतलेले, त्यामुळे त्याचा या बाबीवर विश्वास असतो. पंचांगात व्यक्त केलेले अंदाज अचूक किंवा तंतोतंत नसतात पण एकदमच फालतूही नसतात. मोघम असले तरी शेतीमधील उपयुक्ततेचा विचार केला तर हवामान खात्यापेक्षा काहींना काही अंशी अधिक विश्वासाहार्य नक्कीच असतात.

हवामानाचा अंदाज काढणे हे आकाशाला गवसणी घालण्यापेक्षा जिकिरीचे काम आहे, शिवाय हवामानशास्त्र अजून बाल्यावस्थेतच असल्याने हवामानखात्याचे अंदाज चुकत असावे, त्याला बिचारे हवामानशास्त्रज्ञ काय करतील, असेच मला वाटायचे आणि मग या शास्त्रज्ञाबद्दल सहानुभूती वाटायची. हवामान खात्याबद्दल टीकात्मक लेखन वाचून त्यांच्याबद्दल मनात करुणा उत्पन्न व्हायची. नऊ वर्षापूर्वीपर्यंत तरी माझी अशीच मनोधारणा होती.

पण मी इंटरनेटवर आलो आणि भारतीय हवामानखाते वगळता वेगवेगळ्या परदेशी संकेतस्थळावरील हवामानाच्या अंदाजाची तपशीलवार माहिती पाहून दंगच झालो. बराच काळ मी या अंदाजाची अचूकता पडताळत राहिलो. या अंदाजावर आधारीत शेतीच्या कामाचे नियोजन करीत राहिलो. त्याचा मला खूप फायदा झाला. दुसऱ्या वर्षी अगदी जून महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मला कपाशीची धूळ पेरणी करता आली. अंदाजाप्रमाणे पाऊस आला. माझ्या शेतीपासूनच्या १०० किलोमीटर परिघक्षेत्रात माझी लागवड

इतरांपेक्षा दहा दिवस आधी आणि चांगली झाली. आकाशवाणी-टीव्हीवरील हवामानाचे अंदाज ऐकून ज्यांनी लागवडी केल्यात त्यांच्या लागवडी बिघडल्या. दुबार लागवडीचे संकट कोसळण्याची भीती उत्पन्न झाली होती.

भारतीय हवामान खाते आणि त्यांचे संकेतस्थळ सोडले तर परदेशी अनेक अधिक विश्वासाहार्य संकेतस्थळं आहेत. तेथे पुढील दहा-पंधरा दिवसापर्यंतच्या हवामानबदलाचे अंदाज व्यक्त केलेले असतात. अगदी दर तासाला हवामानात काय बदल घडतील याचा अंदाज व्यक्त केलेला असतो. शिवाय या अंदाजाचे स्वरूपही राज्यनिहाय किंवा प्रांतानिहाय असे मोघम स्वरूपाचे नसून विभागवार असते आणि हे विभाग ५०/१०० किलोमीटर क्षेत्रासाठी असते. तुम्हाला हवे ते तुमचे छोटेमोठे शहर शोधून त्या शहराचे हवामान ठरलेल्या दिवशी, ठरलेल्या वेळी काय असू शकेल याचा अदमास घेता येतो.

या सर्व संकेतस्थळामध्ये शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत निरुपयोगी, समजण्यास क्लिष्ट, काहीही तपशीलवार माहिती उपलब्ध नसलेले संकेतस्थळ म्हणून उल्लेख करायचा झाला तर एकमेव नाव घ्यावे लागते ते भारत मोसम विज्ञान विभागाच्या संकेतस्थळाचे. या संकेतस्थळाचे एका वाक्यात वर्णन करायचे झाल्यास शेतीमधील उपयुक्ततेच्या दृष्टीने अत्यंत फडतूस असेच करावे लागेल. इथे सारे मोघमच मोघम आहे. पुढील ४८ तासांत विदर्भ, मराठवाडा, गोव्यात कुठेकुठे पावसाच्या सरी येण्याची शक्यता आहे हीच यांची हवामानाच्या अंदाजाची संभाव्यता. त्यावरून कशाचाच काहीही थांगपत्ता लागत नाही. पाऊस कुठे आणि केव्हा येणार, याचाही बोध होत नाही. असे मोघमच अंदाज व्यक्त करायचे असेल तर त्यासाठी शास्त्रज्ञ कशाला हवेत? एवढे किंवा यापेक्षा अधिक चांगले भाकीत तर एखादा शेंबडा पोरगाही वर्तवू शकेल. त्यासाठी हजारो कोटी रुपये या हवामान खात्यावर खर्च करायची गरजच काय? एखाद्या बालवाडीतल्या मुलास पेपरमेंट किंवा कॅटबरी दिल्यास तो सुद्धा एवढं वाक्य सहज बोलून दाखवेल. जे काम पेपरमेंटच्या चार गोळ्यांनी होण्यासारखे आहे तेथे हजारो कोटी खर्च करून पांढरे हत्ती पोसण्याखेरीज आपण दुसरे काय करत आहोत? एवढा तरी विचार करायला आपण शिकणार आहोत की नाही?

मुख्य मुद्दा असा की, जे काम परदेशी शास्त्रज्ञांना जमत आहे ते काम आमच्या भारतीय शास्त्रज्ञांना का जमू नये? तेथील संकेतस्थळावरील अंदाज अचूक, तंतोतंत किंवा खरेच असतात, असे मला म्हणायचे नाही. ते चुकण्याचीही शक्यता असतेच. शेवटी अंदाज हा केवळ अंदाज आणि शक्यता ही केवळ शक्यताच असते. पण ही संकेतस्थळे सांभाळणारी माणसे जेवढे परिश्रम घेतात, चिकाटी दाखवतात, तपशीलवार अंदाज व्यक्त करण्याचे धाडस आणि आत्मविश्वास बाळगतात, गरजेनुरूप सॉफ्टवेअर निर्माण करण्याचे कौशल्य दाखवतात; तेच आमच्या हवामानखात्याला का जमू नये? हाच मुख्य प्रश्न आहे आणि त्याचे उत्तर शोधणेही तेवढेच गरजेचे आहे.

हवामानशास्त्राच्या बाबतीत आपण इतर देशांपेक्षा शेकडो वर्षांनी मागे आहोत, हे दिसतेच आहे. हरकत नाही पण; इतर देशांच्या पुढे जाण्याचा, बरोबरी करण्याचा किंवा महाशक्ती बनण्याचा मुद्दाही सोडा, शेतीला थोडाफार हातभार लागेल एवढे तरी हवामानशास्त्र विकसित करण्यासाठी आमचे शास्त्रज्ञ, सत्ताधारी आणि वेळोवेळी निव्वळ पुस्तकी ज्ञानाच्या आधारे शेतीविषयात नको तेव्हा, नको ती लुडबुड करणारी विद्वान मंडळी काही हातपाय हालवणार आहेत की नाही, हाच कळीचा मुद्दा आहे.

अजूनही अनेक देशी संकेतस्थळे परदेशी संकेतस्थळावरील माहितीची उचलेगिरी करण्यातच धन्यता मानतात. गुलामगिरी गेली पण गुलामगिरीची सवय आम्ही बदलायला तयार नाहीत. स्वातंत्र्योत्तर भारतातील शास्त्रज्ञ, सत्ताधारी आणि पुस्तकी ज्ञानाच्या महामेरू विद्वान मंडळींना स्वातंत्र्याचे हवामान मानवणार नाही, याचा अदमास जर महात्मा गांधींना जर तेव्हा आला असता तर ते स्वातंत्र्याचा लढा लढले असते किंवा नाही, याचा अंदाज बांधणे कठीण आहे.

# शरद जोशी : चैतन्यदायी झंझावात


शरद जोशी. नुसतं नावच एका चैतन्यदायी भूतकाळाचं स्मरण जागं करायला पुरेसं आहे. प्रत्यक्षात मी शेतकरी कुटुंबातला नाही. शरद पवारांच्या भाषेत 'भुईमुगाच्या शेंगा खाली येतात की वर' हे माहीत नसणाऱ्या कुटुंबातला! शरद जोशींच्या आंदोलनाचा सुवर्णकाळ १९८० ते ९५. या काळात माझं वय १० ते २० वर्षांच्या दरम्यानचं. त्या काळात दूरदर्शन फारसं नव्हतं. पेपरही फारसे नव्हते. त्यामुळे तो थरार अनुभवता आला नाही... आमच्या अकोले तालुक्यात एकेकाळी शेतकरी संघटनेचा बालेकिल्ला होता. त्यामुळे अनेक आंदोलनांचा प्रभाव त्या वयात पडत राहिला. अनेक आंदोलने बघितल्यामुळे शरद जोशींविषयीचे कुतूहल कायम राहिले.

पुढे समज आल्यावर तालुक्यातल्या इतरांकडून शरद जोशींविषयी कळत राहिले. आमच्या तालुक्याच्या भावविश्वाचाच शरद जोशी भाग असल्याने आमच्या भावविश्वाचे ते भाग बनून गेले. त्यांची भाषणे, लेख, पुस्तके थोडीफार वाचली.

१८ वर्षांपूर्वी मी पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनवाढीला विरोध केला. शरद जोशींना ते समजताच, त्यांनी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य व शेतकरी नेते दशरथ सावंत भेटीला गेल्यावर, त्या मुलाच्या सत्काराला मी स्वत: येतो असे सांगितले. शरद जोशी आमच्या गावात आले. केवळ माझ्या सत्कारासाठी आले. त्या काळात मी प्रचंड शिव्या खाताना शरद जोशींसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीचा विचारवंत, कृतिवंत माझ्यासारख्या ऐन पंचविशीतल्या पोराच्या सत्काराला येतो, हे मला भारावून टाकणारं होतं. तेव्हापासून जोशींविषयी एक व्यक्तिगत कृतज्ञतेची भावना नकळत मनात राहिली.

पण नंतर शरद जोशींनी मेधा पाटकरांवर टीका करताच मेधाभक्त असल्याने काहीसा दुखावलो. नर्मदा आंदोलनाला त्यांचा विरोध अस्वस्थ करून गेला. खुल्या व्यवस्थेची त्यांची मांडणी समजायचं ते वय नव्हतं किंवा समजही नव्हती (अजूनही नाही!) त्यामुळे समाजवादी छायेत वाढलेल्या आम्हाला शरद जोशी दूरचे वाटू लागले. भाजपासोबत जाणे हा तर टोकाचा निर्णय वाटला आणि हळूहळू शरद जोशी व्यक्तीविषयी प्रेम, आकर्षण आणि विचारांविषयी दुरावा असे होऊन गेले... जोशीसाहेबांचे सर्व प्रमुख कार्यकर्ते मित्र असल्याने तो धागा मात्र दुवा ठरला.

श्रीकांत उमरीकरनं शरद जोशींची सर्व पुस्तके नव्याने प्रकाशित केल्यामुळे ती वाचून काढली. शरद जोशी पहिल्यांदा समजल्यासारखे वाटले. गेली पाच वर्षे सरकारी शिक्षणव्यवस्थेचा जवळून अभ्यास करताना नैराश्याने पार झाकाळून गेलेल्या मला त्या दोषांचे विश्लेषण करणारी जणू उपपत्तीत सापडल्यासारखी वाटली. त्या प्रकाशात मला देशातील दारिद्र्य , बेकारी, शिक्षण, आरोग्यव्यवस्थेचा उडालेला बोजवारा या सर्वांकडे बघण्याची दृष्टीच मिळाली. अर्थात संपूर्ण उत्तरे मिळाली नाहीत. या देशातील असंघटित कामगार, आदिवासी व भटके-विमुक्त हा मला अत्यंत अस्वस्थ करणारा विषय आहे. त्यांच्याबाबतची सर्व उत्तरे अजून शोधतोच आहे.



हे सारं मनात चालू असताना शिक्षणावर काही मुलाखती घ्यायला पुण्याला गेलो. काम सुरू केले; पण भूमिकाच काहीशी नक्की नसल्याने म्हणा किंवा नव्या मांडणीनं काहीसं हलवल्यामुळं म्हणा कामात मन लागेना. एखादी गोष्ट करावीशी वाटली नाही, तर नाही करायची हा प्रांजळपणा मदतीला आला. पुन्हा गावाकडं निघालो... सहज वाटलं म्हणून म्हात्रेसरांना फोन लावला. शरद जोशीसाहेब आहेत का?'

उत्तर नाही हे गृहीतच होतं; पण चक्क म्हात्रेसरांनी हो' म्हटलं आणि यायला सांगितलं. मला तो धक्का होता. शरद जोशी असे एकटे भेटू शकतात हे काहीसं अविश्वसनीय होतं.

दिल्लीला planning commission वर निवड झाली तेव्हा दिल्लीत त्यांना भेटायचा तीन वेळा प्रयत्न केला होता; पण भेट झाली नव्हती. त्या पार्श्वभूमीवर त्यांचं सहज भेटणं नवं होतं.

रिक्षा, जीप हे कंटाळवाणे टप्पे पार करत पोहोचलो. साहेबांचा अंतरंगीचा साथी' बबन शेलार आणि म्हात्रेसर भेटले. या दोघांच्या समर्पणाविषयी स्वतंत्र लेख कधीतरी लिहायचा आहे. इतकी ही दोघे शरद जोशींमध्ये विरघळली आहेत.

शरद जोशींच्या खोलीत प्रवेश केला. सिंहाच्या गुहेत जाताना कसे वाटत असेल? याचा थोडाफार अंदाज आला; परंतु त्यांच्या मनमोकळ्या स्वागताने दडपण दूर झालं. जोशीसाहेब काहीसे थकलेले; पण शरीरावरची लकाकी कायम. डोळ्यांतील मिश्किल भाव व बोलण्यातील स्पष्टता कायम. बौधिक अहंकाराबरोबरच चेहऱ्यावरील नम्रताही तितकीच लक्षात येणारी आणि तो अहंकारही आढ्यताखोर नव्हे तर सामर्थ्याची प्रचीती आणून देणारा.

विषय अर्थातच सहाव्या वेतन आयोगावरून सुरू झाला. सहाव्या वेतन आयोगावर मी पुस्तक संपादित केले त्या पुस्तकात जोशीसाहेबांची मुलाखत घेतलेली. जोशीसाहेबांनी पुस्तकावर थोडंफार भाष्य करून शासनानंच आता खिरापत वाटायचं ठरवलं आहे आपण तरी काय करणार?' असं म्हणताच मी तो विषय

वाढवला नाही, कारण गेली १० वर्षे त्या विषयाचे सर्व पैलू मला आता परिचित झालेत!

त्यांची पुस्तकं नव्याने वाचून काढली हे सांगताच ते मिश्किलपणे म्हणाले, ''वेळ जायला तशी ती पुस्तकं चांगली आहेत'' आणि खळखळून हसले. मी 'अंतर्नाद' मधील त्यांच्या 'पुरे करा हे समाजसेवेचे ढोंग' या लेखावर बोललो. त्या लेखात शरद जोशींनी काम करण्यामागच्या स्वकेंद्रित व उथळ प्रेरणांची खिल्ली उडवली आहे.

मी म्हणालो, ''त्या लेखाचे वैशिष्ट्य असे, की आम्हा प्रत्येकालाच त्या आरशात आमचा चेहरा बघता आला.''

ते हसले आणि प्रश्नार्थक बघू लागले.

मी म्हणालो, ''त्या लेखामुळे आमच्या समाजकारणात येण्याच्या प्रेरणा नेमक्या काय आहेत याचा आम्हीच शोध घेऊ लागलो आणि आमच्या उथळपणाची आम्हालाच लाज वाटू लागली. अपराधी भावनेतून मी समाजकारणात आलो आहे असे मला वाटते.''

शरद जोशी म्हणाले, ''अपराधी भावनेनं सामाजिक जाणीव येणं हे अनैसर्गिक नाही, कारण दु:खिताच्या जागी आपण स्वत:ला समजणं हे अगदीच स्वाभाविक आहे.''

पण तरीही नेमकेपणाने मुळातून समस्यांचा अभ्यास नसल्याने आम्ही केवळ भावनिक लाटेवर हिंदकळत राहतो. आम्ही केवळ कोणत्यातरी विचारसरणींच्या प्रेमात पडतो आणि बाहेर होतो याबाबत काय निर्णय करावा, हेच कळत नाही. तुम्हीच मार्गदर्शन करा...'' असे म्हणताच ते हसले व म्हणाले,

राजवाडेंना एक ४० वर्षांचा माणूस मी काय करावे, असे विचारायला गेला. तेव्हा राजवाडे म्हणाले– पाठीवर एक धोंडा बांधून विहिरीत उडी मार, कारण ४० वर्षे निर्णय घेता आला नाही, तर हाच पर्याय आहे...'' माझेही वय ४०च्या उंबरठ्यावर असल्यामुळे मला नकळत ती टोपी फिट्ट बसली. नंतर गंभीर होत ते म्हणाले, शेवटी आपला निर्णय आपणच घ्यायचा असतो; पण खूप पुढचा विचार करण्यापेक्षा फक्त एका पावलाचा विचार करायचा असतो. तुम्हा तरुणांना समाजसेवेचे इतके वेड का? त्यापेक्षा उद्योजक होऊन पैसा कमवा व गरिबांना वाटा. गरिबांसाठी रोजगार निर्माण करावा, असे तुम्हाला का वाटत नाही? तात्त्विक वटवट करण्यात रस का वाटतो? उद्योजक होणे ही समाजसेवा वाटली पाहिजे...'' माझ्या अहंकाराच्या ठिकऱ्यात उडताना केवळ शांतपणे बघत राहणं एवढंच माझ्या हातात होतं... जगण्याचा आधारच कुणीतरी काढून घेतंय असं वाटलं. समाजसेवेची प्रेरणा ही करुणेतून येता कामा नये. करुणेतून समाजसेवा करणाऱ्यांच्या चेहऱ्यावरील भाव प्रचंड उर्मट असतात. ते बघवत नाहीत. ते तडक प्रेषिताच्या भूमिकेत सरकतात.

खुल्या व्यवस्थेत गरिबांची संख्या वाढतच आहे. महाराष्ट्रात गेल्या पाच वर्षांत एक कोटी गरीब वाढले. सक्सेना समितीने ४८% गरीब तर तेंडुलकर समितीने ३८% गरीब दाखविले आहेत, हे सांगितल्यावर ते हसले. ते म्हणाले, हा फक्त रेषा हलवण्याचा खेळ आहे. खरा अभ्यास करायचा असेल तर १९७१ पासून गरिबी हटाव' योजनेपासून आजपर्यंत दारिद्र्य रेषेच्या सर्व योजनांचं काय झालं याचा अभ्यास करायचा हवा, त्यातून गरिबी हटावमधून झालेल्या श्रीमंतांचा शोध लागेल!'' थोडं गंभीर होत ते म्हणाले, मुळात गरिबी हटविण्याचं केंद्र, त्याबाबत निर्णय घेणारं ठिकाण हे नियोजन आयोग असण्यापेक्षा गरिबाचं घर असलं पाहिजे. तरच योग्य निर्णय होण्याची शक्यता आहे. समूहाचा निर्णय हा कधीच बरोबर असू शकत नाही. व्यक्ती हेच निर्णयाचं केंद्र असू शकते. खिशातल्या थोड्या पैशातून सिनेमा बघायचा, की हॉटेलात जायचं? याचा योग्य निर्णय वसतिगृहातील मुलगाच करू शकतो... होस्टेलचा रेक्टर तो निर्णय करू शकत नाही. याचे कारण आनंदाची मात्रा कशातून किती याची अनुभूती तो विद्यार्थीच घेऊ शकणार आहे. तेव्हा दारिद्र्य निर्मूलन, निर्णयप्रक्रिया या सर्व गोष्टींकडेच नव्याने बघण्याची गरज आहे.

गरिबी निर्मूलनाबाबत तुमच्या डोक्यातले डॉन क्विझोट काढून टाका. स्वातंत्र्याच्या भूमिकेतून विचार करा. त्या गरिबांच्या तत्कालिक फायद्यांपेक्षा दीर्घकालीन लाभाचा विचार करा. केरळात शेतकऱ्यांपेक्षा शेतमजुरांच्या हिताचा जास्त विचार केला, त्यामुळे केरळातील शेतीच आज अडचणीत आली. महाराष्ट्रात तुम्ही हमालांच्या हितासाठी कायदे केले, तर ग्राहकांनी चाकाच्या बॅगा घेऊन घेऊन हमालांचा रोजगार मारला. तेव्हा असंघटितांसाठी आपली करुणा दीर्घकालीन नुकसान तर करत नाही ना? याचा विचार करायला हवा. तुमची विचारसरणी ही गरिबांना अपंग करणारी नसावी. त्याच्यातील पुरुषार्थ जागविणारी असावी. त्यांचे कर्तृत्व कसे फुलवता येईल, या दृष्टीने विचार करा. आपल्या मनात पहिला विचार त्याला काय भीक घालता येईल हा येतो. हे जास्त घातक आहे.''

हे ऐकताना गेली २० वर्षे ऐकलेली विविध भाषणे, परिषदा, पुस्तके, मासिके यातून ऐकलेली साचेबद्ध मांडणी प्रश्नांकित होत होती. अस्वस्थता वाढत होती.

मनात कुठेतरी शरद जोशी खुल्या व्यवस्थेतील अन्यायांकडे कसे बघतात? ही उत्सुकता होती. सेझमधील जनसुनवाईचा दिल्लीचा अहवाल वाचला होता. शेतकऱ्यांच्या जमिनी कशा सक्तीने ताब्यात घेतल्या गेल्या याच्या विषण्ण करणाऱ्या कहाण्या वाचल्या होत्या. त्यांच्यात मात्र स्पष्टता होती. ते शांतपणे म्हणाले, ज्याला जमीन विकायची नाही, त्याची कोणत्याही स्थितीत जमीन ताब्यात घ्यायची नाही आणि ज्याला जमीन विकायची आहे. त्याला जमीन विकू दिली पाहिजे...'' मी तोडत म्हणालो, पण शेतकऱ्याला नाहीतरी त्या जमिनी परवडत नाहीत, नापीक

आहेत असे सांगून ते जमिनी ओढतात... शरद जोशींमधील मिश्किलता जागी झाली. ते म्हणाले– आम्ही फक्त नापीक जमिनीच घेऊ असे म्हणणे म्हणजे सुलतानाने आम्ही केवळ गावातील कुरूप मुलीच उचलून नेऊ असे म्हणणे आहे.'' मी त्यांच्या तिरकस भाष्यावर खूप हसलो. मी म्हणालो, पण जमिनी विकून माणसं ते पैसे उडवून टाकतात.'' ते म्हणाले, प्रत्येकाचा निर्णय प्रत्येकाला घेऊ द्या. हा प्रश्न मुळातच प्रॉपर्टीचा हक्क मूलभूत नाही त्यातून आला आहे.''

या बाबत तुम्ही पहिल्या पंतप्रधानांना दोषी ठरवाल का?'' थोडंसं थांबून ते म्हणाले, मुळातच स्वातंत्र्य ही माझ्या सर्व मांडणीची मध्यवर्ती कल्पना आहे. त्या स्वातंत्र्याच्या आधारावरच अर्थशास्त्र, राज्यशास्त्राची रचना करायला हवी.''

मी विचारलं, खुल्या व्यवस्थेला आता २० वर्षे पूर्ण होतील. १९९३ मध्ये डंकेलचे स्वागत करताना तुम्ही जी गृहीतकं मांडली. ती आता कितपत खरी ठरलीत? याचा हिशेब मांडायचा का? खुल्या व्यवस्थेत बहुराष्ट्रीय कंपन्या शेवटी नैसर्गिक लूट करायलाच धावल्या. जल, जंगल, जमीन हेच त्यांनी पादाक्रांत केले. इथली व्यवस्था सहज विकली जाईल? असे वाटले नव्हते का?''

त्यांना बहुधा हे प्रश्न अनेकदा विचारले गेले असावेत. ते म्हणाले, खुली व्यवस्था या देशात खरंच आली का? शासनाचा हस्तक्षेप किती कमी झाला? व्यवस्था जर पूर्णपणे राबवली नाही तर त्याचा परिणाम कसा तपासणार? तेव्हा अंमलबजावणी तपासायची तर कार्यवाही प्रामाणिक झाली का? हे बघायला हवे. मी म्हणालो, याचा अर्थ सर्व खुलीकरण एकाचवेळी का सुरू करायला हवे होते... पूर्ण सेट स्वीकारला तसं परवानगी द्यायला हवी होती.''

ते म्हणाले, असे होत नसते. असे कोणत्याच देशात घडलेले नाही. टप्प्याटप्प्यानेच होत असते.''

प्राथमिक शिक्षण हा माझ्या अभ्यासाचा विषय. शेतकरी संघटकच्या मुखपत्रात मी शिक्षणाच्या रचना बदलाविषयीची, उदारीकरणाविषयी लेख लिहिला होता. चिली, स्वीडन या देशातील व्हाऊचर सिस्टिम' अशी आहे की सरकार प्रत्येक मुलावर जितका शाळेसाठी खर्च करते तो खर्च व्हाऊचर्स स्वरूपात पालकांना दिला जातो. पालकांनी शाळेची निवड करून त्या शाळेत व्हाऊचर्स जमा करायचे. त्या रकमेतून शाळेने शिक्षकांचे पगार करायचे. शरद जोशींना या कल्पनेवर छेडले.

ते म्हणाले भारतीय परंपरेतील गुरुदक्षिणेशी ही कल्पना जोडता येईल. विद्यार्थ्यांनीच आपल्या शिक्षकाची निवड करावी, विद्यापीठे ही कल्पना व्यक्तीपातळीपर्यंत सीमित करावीत. मी शरद जोशींचा अर्थशास्त्राचा विद्यार्थी आहे' इथपर्यंत विकेंद्रीकरण झाले पाहिजे. ग्राहक हा विद्यार्थी असल्याने तोच सक्षम झाला पाहिजे. शिक्षण हे खुल्या व्यवस्थेने झाले तरच ते प्रभावी होईल. शिक्षणाविषयी ते बोलू लागताच माझ्यातील तथाकथित शिक्षणतज्ज्ञही गडबडून गेला. ते म्हणाले, राज्यसभेतील भाषणात मी म्हणालो, की उच्चशिक्षणात फक्त १२ विद्यार्थी पोहोचतात, यात परिस्थितीमुळे जे ड्रॉपआऊट होतात त्यात सुधारणा झाली पाहिजे; परंतु सर्वांनीच अंतिम बिंदूपर्यंत पोहोचले पाहिजे अशी अपेक्षा करणे म्हणजे दुसरीकडून पाणी उसने आणून जमिनी बागायती करा, असा आग्रह धरण्यासारखे आहे. शिक्षणात नकळत वगळण्याची प्रक्रिया असणारच. त्या वगळण्याच्या प्रक्रियेमुळेच शेवटच्या टोकावर पोहोचण्याला अर्थ प्राप्त होतो.

प्रयोगशील शिक्षणात मुलांना हळुवार पद्धतीने शिकवण्याला महत्त्व आहे. शिक्षा न करता मुलांना फुलविणे महत्त्वाचे मानले जाते. याला शरद जोशींचा जोरदार विरोध आहे. ते म्हणाले, हळुवार हाताळून मुलांना पंगू बनविणाऱ्यात या पद्धती आहे. हीच विचारसरणी पुढे गरिबी हटविण्यापेक्षा गरिबांना कुरवाळण्यात रूपांतरित होते. अशा प्रकारची कमजोर मुलेच पुढे आत्महत्येकडे ढकलली जातात का? याचाही विचार केला पाहिजे. त्यामुळे १ ली ते ८ वी परीक्षाच नको. या विचारसरणी मला मान्य नाहीत. नापास होणं हा शिक्षणप्रक्रियेचाच एक भाग आहे. इतक्या स्वच्छपणे त्याकडे बघता आले पाहिजे. शिक्षणात खूप काही वाचूनही इतकं ठामपणे मत मांडणाऱ्या जोशींपुढे मला काही काळ निरुत्तर झाल्यासारखं वाटलं.

महिलांच्या विधेयकावर शरद जोशींनी विरोधी मतदान केलं. त्यावर समजून न घेता टीका झाली. शरद जोशींनी तीन मतदारसंघ एक करून तीन प्रतिनिधींमध्ये एक महिला प्रतिनिधी असावी असा प्रस्ताव मांडला. तो प्रस्ताव वास्तववादी होता. त्याविषयी विचारलं, तेव्हा ते हसले... म्हणाले,की चांदवडला लाखो महिलांनी २० वर्षांपूर्वी स्वातंत्र्याची शिदोरी देणाऱ्या मला महिलाविरोधी जरूर म्हणा; पण तेथून पुन्हा निवडणूक लढवायची नाही, मग मतदारसंघाकडे दुर्लक्ष केले तरी चालेल हा या विधेयकातला सर्वांत क्रिटिकल भाग आहे, हे लक्षात कसे येत नाही. बिजिंग महिला परिषदेच्या अगोदर महिला प्रश्नाची केलेली मांडणी अधिक द्रष्टेपणाची होती. ते म्हणाले, की तुम्हाला स्त्रीचा पुरुष बनवायचा आहे का? की तिची स्वत:ची काही बलस्थाने आहेत त्याचाही विचार करायचा आहे की नाही? एक सुशिक्षित तरुणी मला म्हणाली, की मला नटायला आवडते. खूप आनंद मिळतो. तिला तुम्ही प्रतिगामी ठरवणार का? शिक्षणात स्वयंपाक करण्याचे कौशल्य ठेवले तर गदारोळ का होतो?

मला ते सारं ऐकताना चांदवडला लाखो महिला डोंगरी शेत माझं गं' हे गाणं म्हणताना आठवत होत्या आणि फ्रेंच बोलणारा, धड मराठीही न येणारा हा टी शर्ट, जीनमधील शरद जोशी त्या निरक्षर बायकांचा भाऊ झाला होता. मला उत्सुकता त्या मांडणीची नव्हती. वर्षानुवर्षे कुटुंबात राहून नवऱ्यानशीही मनातलं

न बोलणाऱ्या या अडाणी महिला शरद जोशींसारख्या पाश्चात्त्य वळणाचं व्यक्तिमत्त्व लाभलेल्या माणसाशी इतकं मनमोकळं कसं बोलल्या असतील? शरद जोशींना त्यात विशेष काहीच वाटत नव्हतं. ते म्हणाले, मी विचारलेल्या सर्व प्रश्नांची त्या उत्तरे देत. काहीच लपवत नव्हत्या. कदाचित माझ्याविषयी त्यांना अधिक विश्वास वाटत असावा. फ्रेंच बोलणारे जोशी आणि निरक्षर महिला हे अंतर एक विश्वास, प्रामाणिकता भेदून पार जाऊ शकतो. ते म्हणाले, महिला स्वातंत्र्याच्या भुकेल्या आहेत. ती स्वातंत्र्याची प्रेरणा जागवायला हवी. कमला दाससारखी जन्मभर बंडखोर म्हणून जगलेली लेखिका आयुष्याच्या संध्याकाळी मुस्लिम धर्म स्वीकारते व तो धर्म स्वातंत्र्याला सर्वांत पोषक असल्याचा तिला साक्षात्कार होतो... हे कसं समजावून घ्यायचं? स्वातंत्र्याचा शोध हेच स्त्री चळवळीचं सूत्र असलं पाहिजे.

आमची चर्चा सुरू असताना म्हात्रेसर लोकायत' हे ५०० पानांचं इंग्रजी पुस्तक घेऊन आले. दुपारपासून जोशींचा पाठपुरावा चालला होता आणि म्हात्रेसर त्यांच्या नेहमीच्या चिकाटीने शोधत होते. ते पुस्तक सापडल्यावर शरद जोशींना खेळणी सापडल्यावर आनंद व्हावा तसा आनंद झाला... ते भराभरा पुस्तकाची पाने उलटू लागले... मला ७५ वयाच्या व्यक्तीची ती ज्ञानलालसा, उत्कंठा थक्क करून गेली.

अलीकडे शरद जोशी धर्म, अध्यात्म, जडवाद, चैतन्यवाद, लोकायत हा सारा अभ्यास करताहेत. त्यांच्यावर पटकन शिक्काही मारता येत नाही. ते संस्कृतचे पंडित आहेत इथपर्यंत माहीत असते; परंतु जडवाद-चैतन्यवाद यात ते कुठे? हे कळत नाही. ते हसून म्हणाले, घाबरू नका... मी अजून जडवादीच आहे! दलित, बहुजनांचा कैवारी असणाऱ्या कुणीही अध्यात्म परंपरा अभ्यासली नाही, त्यामुळे ती एका विशिष्ट वर्गाचीच परंपरा झाली. मी शेतकऱ्यांच्या नजरेतून हे सारे विश्लेषण करू इच्छितो.' पुढे ते म्हणाले, की मी मूळचा शंकराचार्यांचा अद्वैत तत्त्वज्ञानी होतो. तिथून मी दूर गेलो. पण आता उत्तराच्या जवळ आहे. तरीसुद्धा एका भिंतीजवळ मी उभा आहे.

पण मुळात धर्म, अध्यात्म, चैतन्यवादाचे आकर्षण का वाटते?

त्याचे कारण सोपे आहे. मी जेव्हा चळवळीत आलो तेव्हा तंत्रज्ञान आणि जेनेटिक्स या दोनच गोष्टी माझ्यासाठी अज्ञात होत्या. पैकी तंत्रज्ञानाचा अभ्यास बऱ्या पैकी केला. एका वनस्पतीवर रोपणाने जर परिवर्तन होते, तर माणसात जेनेटिक्सने बदलाची शक्यता आहे का? हे मी शोधतो आहे. आपले जसे मन:पटल आहे तसे एक वैश्विक मन:पटल आहे. या दोन्ही पटलांच्या नात्याचा मी शोध घेतो आहे... ते जे बोलत होते त्यातले खूप काही कळाले नाही, कारण ते संकल्पनात्मक शब्द होते. फक्त मनात विचार आला, की जडवाद, चैतन्यवाद या हजारो वर्षांच्या अनियंत्रित कसोटी सामन्याचा शरद जोशी निर्णय लावतील तेव्हा शेतकरी अर्थशास्त्राइतकेच ते देशाला योगदान असेल; पण तो अभ्यास करताना त्यांच्यातील विद्यार्थी बघणं लोभसवाणं असतं.

पुराणवाङ्मयातील कथांचा अर्थ आजच्या जगण्याला ते लावतात तेव्हा ती त्यांची प्रतिभा वाटते. अध्यात्मावर बोलताना ते म्हणाले, की येशू ख्रिस्ताच्या जन्माच्या वेळी त्याचे दर्शन घ्यायला सहा साधू निघाले. पाच साधू पोहोचले; पण सहाव्या साधूला दरोडेखोरांनी पकडून गुलाम केले आणि आफ्रिकेत विकले. तेथून सुटका करून तो जेव्हा ख्रिस्ताच्या गावाला पोहोचला तेव्हा ख्रिस्ताला त्याच दिवशी क्रूसावर चढवले होते. त्याला उतरावयाचे काम या साधूला करावे लागले. शरद जोशी किंचित थांबतात आणि म्हणतात, या साधूशी माझी नाळ जोडलेली मला वाटते... माझी नियतीच मला या साधूची वाटते. स्वगत बोलावे तसे शरद जोशी बोलू लागतात. लहानपणीच्या शारीरिक आजारातून स्वातंत्र्याची प्रेरणा माझ्यात आली असेल; पण वेदनेशी नाते त्या ख्रिस्ताचे शव उतरविणाऱ्या साधूशीच माझे आहे... मी काहीसा उद्विग्न आहे. दुसऱ्याच्या जगण्यात हस्तक्षेप करण्याचा मला काहीच अधिकार नाही, असे मला वाटते.दीड लाख शेतकरी आत्महत्या करतात हा पराभव वाटू लागतो. आपण मानसिक बळ, लढण्याची ताकद दिली नाही, असे वाटू लागते...

ते सारं ऐकताना गलबलून येतं. स्वत:च्या आयुष्याची इतकी कठोर मीमांसा आजकाल कोण करतंय? प्रत्येक क्षणाक्षणाला स्वत:कडे इतक्या तटस्थपणे बघणं आणि प्रांजळपणाने सत्याला सामोरे जाणे हे करणारे शरद जोशी. ७५ व्या वर्षीही एखादे पुस्तक सापडल्यावर लहान मुलासारखे हुरळून जाणारे. व्यक्तिगत आयुष्याची होरपळ करून सन्मान तर सोडाच; पण अमेरिकेचा एजंट पासून जातीवाचक शिव्या झेलून, मतदारांची कृतघ्नता पचवून, शारीरिक आघात झेलूनही ही ज्ञानलालसा नि:शब्द करून टाकते... पृथ्वीवरून नष्ट होणाऱ्या दुर्मिळ प्रजातींकडे जसे बघावे, तसे आपण त्यांच्याकडे बघू लागतो...

रोज नवं पुस्तक वाचून... नवं भाषण ऐकून नव्या नव्या विचारसरणीवर हिंदकळत केवळ चर्चा करणारे आपण आणि स्वित्झर्लंडच्या बर्फापासून आंबेठाणच्या शेतातील ढेकळं तुडवत, राज्यसभेपासून गावच्या चावडीपर्यंत आणि जागतिक बँकेतल्या एखाद्या विदुषीपासून चेहऱ्यावर पदर ओढलेल्या खेड्यातल्या मायेपर्यंत फिरणारा हा झंझावात हिमनगासारखा फक्त जाणवत राहतो...

शरद जोशींना आम्ही बघितलंय आणि ऐकलंय एवढीसुद्धा आपली उपलब्धी खूप झाली.

**- हेरंब कुलकर्णी**

**(युगात्मा शरद जोशी यांची त्यांच्या जन्मदिवसानिमित्त २०१० साली घेतलेली विविध विषयांवरची ही मुलाखत)**

♦ ♦ ♦

# शेतकऱ्यांचा संप सपसेल फसला

शेतकरी संप घडवून आणण्याची कल्पना कशी आणि कुणाला सुचली याबद्दल अनेक दंतकथा ऐकायला मिळाल्या आहेत, पण काही युवकांना अशी कल्पना सुचली आणि ते शेतीचा संप करायला तयार दिसल्याबरोबर सरकारच्या विरोधात असंतोष निर्माण करण्याची चांगली संधी प्राप्त झाल्याचे हेरुन त्याला मुत्सद्दी राजकीय पाठबळ मिळाले आणि मग अत्यंत सावधगिरीने त्या दिशेने पावले पडायला सुरुवात झाली.

सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी पुणतांब्याच्या शेतकऱ्यांनी संपावर जाण्याचे आंदोलन निश्चित करुन १ जून पासून पेरणी बंद करुन संपावर जाण्याचा ग्रामसभेत ठराव करण्यात आला. त्यासोबतचअनेक ग्रामपंचायतींनी सुद्धा असे ठराव करून सरकारकडे पाठवले. ही बातमी पद्धतशीरपणे पेरुन प्रसारमाध्यमात बातम्या येतील अशी व्यवस्था करण्यात आली.

तो दिवस भाग्याचा, ज्या दिवशी शेतकरी म्हणेल की मी फक्त माझ्या पोटापुरतेच पिकवेन, विकायला नेणार नाही असे विचार १९८३ च्या सुमारास युगात्मा शरद जोशींनी मांडले होते. शरद जोशी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त शेगाव येथील दि. १० नोव्हेंबर २०१० रोजी आयोजित शेतकरी महामेळाव्यात बोलतानाही ते म्हणाले होते की, आम्ही वाटेल तितकं पिकवू आणि त्या सगळ्या पिकाला आम्ही मागू तो भाव मिळाला पाहिजे, हे जगामध्ये शक्य नाही. कोणत्याही बाजारपेठे मध्ये हे शक्य नाही. ज्याला आपल्या पिकाचा भाव मिळवायचा आहे त्याला पिकाचं नियंत्रण करायला पाहिजे. तुमच्या घरची पोरं जशी हुशार व्हावी तर कुटुंबनियोजन केलं पाहिजे. तसं पीक नियोजन केल्याशिवाय तुम्हाला आता गत्यंतर नाही. कुटुंब नियोजनासारखं हम दो, हमारे दो सारखं आता आपल्याला पीक नियोजन करावं लागेल. आजपर्यंत आपण शेतकऱ्याने घरच्या लोकांना मातेरं खाऊ घातलं आणि चांगलं-चांगलं निवडक धान्य, चांगला-चांगला निवडक भाजीपाला, चांगलं-चांगलं दूध बाहेर विकलं. मी तुम्हाला सल्ला देणार आहे. तो सल्ला असा की, याच्यापुढे पहिल्यांदा कमी पिकवा, कमी पिकविण्याचा एक सोपा मार्ग आहे. बाजारामध्ये जाणे बंद करा. बाजारामध्ये खतबीत विकत घ्यायला जाऊ नका आणि तुमचा मालही विकायलाही जाऊ नका. तुमच्याघरचे दूध तुमच्या पोराबाळांना पाजा. चांगलं अन्नधान्य, सकस जैविक पद्धतीने पिकविलेलं अन्नधान्य आपल्या पोरांना खाऊ घाला. याच्यापुढे त्यांना मातेऱ्यावर वाढवू नका.

**संकल्पना आणि आंदोलनातील फरक :**

कमी व पोटापुरते पिकविण्याचा विचार युगात्मा शरद जोशींनी अवश्य मांडला पण संकल्पनेचे रुपांतर आंदोलनात त्यांनी कधीच केले नाही. गावबंदी, रस्तारोको, रेलरोको सारखे अत्यंत कठीण व जिवावर उदार होऊन करावयाचे आंदोलन त्यांनी दिले पण कमी पिकवा असे वरवर अत्यंत सोपे, सुलभ वाटणारे आणि घरातच बसुन करता येणारे आंदोलन मात्र त्यांनी कधीच दिले नाही. ते नेहमी म्हणायचे की शेतकऱ्यांना उपाशी राहण्याचे व शेती पडीत ठेवण्याचे आंदोलन मी कधीच करायला सांगणार नाही. शेतकरी उत्पादक व सृजक आहे. उत्पादकाला उत्पादनापासुन व सृजकाला सृजनापासून वंचित ठेवता येत नाही अथवा शेतकरी नवनिर्मितीचा शिल्पकार असल्याने नवनिर्मिती थांबविणे त्याला कधीच मान्य होऊ शकत नाही. शेती पडीत ठेवण्याची शक्यताच अव्यवहार्य असल्याने ३५ वर्षाच्या प्रदिर्घ आंदोलन काळात त्यांनी शेती पडीत ठेवण्याचे आंदोलन कधीच दिले नाही. जे शरद जोशींनी कधीच केले नाही नेमके तेच करायचे दुस्साहस फक्त अविचारी व्यक्तीच करु शकतो. हीच चूक शेतकऱ्यांच्या संपाची घोषणा करणाऱ्यांनी व त्याला पाठींबा देणाऱ्यांनी केली.

**शेतकऱ्यांचा संप नव्हे टाळेबंदी!**

संप फक्त कामगार करु शकतात, मालक संप करुन आपलाच व्यवसाय मोडीत काढू शकत नाही. शेतातील मजूर संप करु शकतील पण शेतकरी स्वत:च मालक असल्याने संप करु शकत नाही. मालक सर्व शक्यता लक्षात घेऊन काही काळासाठी टाळेबंदी करु शकतो, पण संप किंवा टाळेबंदी शेतीमध्ये कदापी शक्य नसतानाही अर्थशास्त्राचा व आंदोलनाच्या रणनीतीचा यत्किंचितही अभ्यास नसणाऱ्या काहींनी राज्यभरात शेतीच्या संपाची घोषणा केली व त्याला तशाच पठडीतला विचार बाळगणाऱ्या काहींनी पाठींबा दिला. वास्तविकता शेतकऱ्यांना संप पुकारायचा असेल तर .....

१) शेतात जायचे नाही.
२) गुरांचा चारापाणी अथवा शेणगोटा करायचा नाही.
३) शेतीचा उदीम, नांगरणी, वखरणी, पेरणी, काढणी, मळणी करायची नाही.
४) भाजीपाला, फ़ळांची काढणी-तोडणी करायची नाही.
५) दूध काढायचे नाही.

निदान इतके पथ्थ्य तरी नक्कीच पाळावे लागतील तरच त्याला शेतीचा संप म्हणता येईल.

शेतकरी संपावर जाणार ही घोषणा आकर्षक आणि लोकप्रिय ठरण्याची शक्यता वाटल्याने ती उचलून धरण्यात आली असावी, असे दिसत आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याऐवजी ज्यांना राजकीय सत्तांतर घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण करण्यात स्वारस्य होते त्यांनी आयती संधी हेरुन

रसद पुरवणे सुरु केले. सोशल माध्यमांच्या माध्यमातून या संपाचा बराच गवगवा झाला, प्रसार माध्यमातून याच विषयावर एक-दोन नव्हे तर चक्क लेखमाला लिहिण्याची चढाओढ सुरु झाली तेव्हाच या संपामागे कोणीतरी अदृश्य पण भारीभक्कम शक्ती काम करत असल्याचा अनेकांना अंदाज आलाच होता.

१ जून पासून पेरणी बंद करुन संपावर जाण्याचा अनेक ग्रामपंचायतींनी ग्रामसभेत ठराव करुन राज्यभर शेतकरी संपाचा गवगवा करण्यात आला पण संप करायची वेळ आली तेव्हा आपापली शेती पडित ठेवायला या संबंध राज्यात एकही शेतकरी तयार झाला नाही आणि संप सुरु व्हायच्या आधीच शेतकरी संपाचा शतप्रतिशत फज्जा उडाला.

**शेतकरी कार्यकर्त्यांचे आंदोलन तेजस्वी :**

संप सुरु व्हायच्या आधीच शेतकरी संपाचा शतप्रतिशत फ़ज्जा उडाला मात्र संपाच्या नावाखाली दूध व भाजीपाला विकू नका. आपल्या मुलासाठी दूध काढा बाकी वासरू पारडीला पाजा. थेंब भर दूध विकू नका. भाजीपाला काढून जनावरांना खाऊ घाला, असा कार्यक्रम हाती घेण्यात आला पण तोही तुरळक अपवाद वगळता पूर्ण फसला. दूध व भाजीपाला बाजारात विकणे शेतकऱ्यांनी सुरुच ठेवले त्यामुळे मग पुन्हा एकदा संपाच्या नावाखाली आंदोलन सुरु झाले. शहराकडे जाणारा भाजीपाला, दूध अडविण्यात आले. दुधाचे टँकर अडवून दूध रस्त्यावर ओतण्यात आले. भाजीपाला घेऊन जाणाऱ्या वाहनांना अडवून भाजीपाला रस्त्यावर टाकण्यात आला.

दरम्यान आंदोलनाने धारण केलेले उग्र स्वरूप व शहरांत निर्माण होणारी संभाव्य टंचाई लक्षात घेता सरकारही आंदोलकांसमोर नमते घेत चर्चेला तयार झाले पण त्याचा चांगला उपयोग शेतकरी संपाच्या सेनापतींना करुन घेता आला नाही. काहीही ठोस मागणी पदरात पाडून न घेताच सरकारशी समझोता करुन शेतकरी संप मागे घेत असल्याची घोषणा करण्यात आली. सैनिकांनी रणामध्ये कमावले अन् कद्रू सेनापतींनी तहामध्ये गमावले अशीच एकंदरीत शेतकऱ्यांच्या संपाच्या नावाखाली झालेल्या शेतकरी आंदोलनाची अवस्था झाली.

**(अंगारमळा ब्युरो)**

***कोणीतरी त्यांची आता, पडजीभ उपटली पाहिजे***
***नाटकी बोलतात साले, की गरिबी हटली पाहिजे***

**- अभय**

♦ ♦ ♦

**पापण्या शेंदून देऊ यापुढे पाणी पिकांना,**
**पावसाची वाट बघणे हा जुना पर्याय झाला....**
**- गोपाल मापारी**

# माजाभरली मुक्ताफ़ळे

शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करा, ज्याला शेती करायची आहे तो करेल व जे मरताहेत त्यांना खुशाल मरु द्या! **– खा. संजय धोत्रे**

****

शेतकऱ्यांची पोर जीन पॅन्ट घालून आंदोलन करतात. **– खासदार व मंत्री हंसराज अहीर**

****

शेतकरी हा बेरोजगारी किवा उपासमारी मुळे आत्महत्या करीत नसून, आज काल शेतकऱ्यांची आत्महत्या करण्याची fashion व ट्रेंड आली आली आहे. **– खासदार गोपाळ शेट्टी**

****

एवढी तूर खरेदी केली तरी रडतायेत साले. **– प्रदेशाध्यक्ष व खासदार रावसाहेब दानवे**

****

आवाज वाढवून बोलू नका, सरकारकडे क़ाय पैसे छापण्याची मशीन आहे? **– सहकारमंत्री चंद्रकांत पाटील**

****

शेतकरी मोबाइलचं बिल भरतो, तर वीजेचं बिल भरायचे पैसे नाहीत काय? **– माजी मंत्री एकनाथ खडसे**

****

शेतकरी संपावर गेले तरी काही फरक पडणार नाही.आम्ही कमी पडले तर बाहेरच्या देशातून आयात करू **– मुख्य प्रवक्ते माधव भांडारी**

****

किसानों की आत्महत्या का कारण ड्रग्स, प्रेम, प्रसंग, और नपुसंकता है **– केंद्रीय कृषिमंत्री राधामोहन सिंग**

****

एक-दो किसानों की खुद्‌कुशी पर कर्जमाफी नहीं होनी चाहिए. इस तरह की कर्ज माफी देश की आर्थिक हालात के लिए ठीक नहीं होगी. **– सांसद सुब्रमण्यम स्वामी**

****

सरकार भरोसे न रहें किसान **– केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

****

किसानों तुम्हारी औकात क्या है ...??? ...दो मिनट में ठीक कर दूंगा. **– कृषि राज्यमंत्री संजीव बालियान (राज्यस्थान)**

****

किसान कायर और अपराधी हैं **– कृषिमंत्री ओपी धनकड, (हरयाणा)**

****

कर्जमाफी फॅशन हो गया हैं! **– केंद्रीय मंत्री वैंकय्या नायडू**

♦ ♦ ♦

# शेतकऱ्यांचा उद्वेग आणि उद्रेक

मागच्या २-३ महिन्यापासून शेतकरी संपाची चर्चा होती.पुणतांबा गाव आणि परिसरातील शेतकरी संपावर जाणार अशी ती चर्चा होती. पुणतांबा ग्रामसभेने तसा ठराव देखील केला होता.महाराष्ट्रातील शेतकरी संपावर जाईल अशी चर्चा नव्हती आणि नियोजन तर अजिबात नव्हते. सुकाणू समिती बनली होती, पण त्यात कोण लोक आहेत, त्यांच्या केव्हा बैठका झाल्या, मागण्या आणि आंदोलनाचे स्वरूप काय याबाबत महाराष्ट्र अंधारातच होता. केवळ १ जूनच्या संपाच्या बातम्या माध्यमात झळकत होत्या आणि त्या आधारे अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी आंदोलनात उतरण्याची तयारी केली आणि आंदोलनात उतरले देखील. सरकारला देखील एवढ्या मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधावरून रस्त्यावर उतरतील अशी अपेक्षा नसावी. आंदोलनाचे स्वरूप आणि व्याप्ती पाहून एका दिवसातच सरकार खडबडून जागे झाले आणि दुसऱ्या दिवशी संप संपविण्याच्या गोपनीय हालचाली झाल्यात. एवढ्या लवकर सरकार वाटाघाटी करेल अशी अपेक्षाच नसल्याने आंदोलक शेतकरी बेसावध राहिलेत. त्यांच्या बेसावधपणाचा फायदा घेत सरकारने आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या रात्रीच वाटाघाटीचा जुगाड जमविला. आंदोलनात आणि आंदोलकांना माहित नसलेल्या सुकाणू समितीत संघ-भाजपचे जे कार्यकर्ते होते त्यांचा उपयोग करून घेत सरकारनी वाटाघाटीचा घाट घातला आणि आंदोलन मागे घेण्यास उपस्थितांना तयार केले. एवढेच नाही तर आंदोलन मागे घेतल्याची बातमी सकाळ पर्यंत सगळीकडे कळेल आणि पसरेल याची व्यवस्था सरकारने केली. आंदोलन सुरु काय होते आणि मागे काय घेतले जाते यामुळे संभ्रम आणि गोंधळाची स्थिती निर्माण झाली. संघ-भाजपच्या कार्यकर्त्यांना हाताशी धरून सरकारने आंदोलनाचा गेम केला अशा चर्चे सोबत फडणवीस आणि त्यांच्या सरकार बद्दलचा क्षोभ वाढला. या क्षोभामुळे सुरुवातीला आंदोलन संपविण्यात आणि नंतर आंदोलनात फुट पाडण्यात सरकार यशस्वी झाल्याची चर्चा फार काळ टिकली नाही आणि सरकारने बनाव केला त्याला उत्तर म्हणून अधिक त्वेषाने पुढे आंदोलन चालू राहिले. मात्र या सगळ्या गोंधळात एक बाब स्पष्ट झाली की आंदोलकात ताळमेळ. समन्वय आणि माहितीचा अभाव होता. १ जूनचा संप हे निमित्त होते. या निमित्ताने सरकारच्या शेतीविषयक धोरणा बद्दल साचलेल्या रागाला वाट मोकळी झाली. आधीच साचलेला राग आणि त्यात सरकार पक्षाच्या जबाबदार लोकांनी केलेल्या बेजबाबदार आणि हीनदर्जाच्या वक्तव्याने संतापाचा कडेलोट झाला. विरोधी पक्षात काही दम नाही याची खात्री असल्याने सत्तापक्ष उद्दामपणे कर्जमुक्ती बाबत टाळाटाळ करीत होता. उत्तर प्रदेशात कर्जमाफी आणि आपल्या तोंडाला मात्र पाने पुसण्यात येत असल्याच्या भावनेने अस्वस्थता होतीच. त्यातच तूर खरेदीचा जो फज्जा उडाला आणि अनेकांना हमीभावापेक्षा कमी किंमतीला तूर विकावी लागली किंवा खरेदीदारच मिळाला नाही यामुळे हमीभावाचा मुद्दा महत्वाचा बनला. त्यामुळे साहजिकच हमीभाव अधिक ५० टक्के नफा या मोदी आश्वासनाची शेतकऱ्यांना तीव्रतेने आठवण झाली.साहजिकच फार विचारविनिमय आणि चर्चा न होताच कर्जमुक्ती आणि स्वामिनाथन आयोग लागू करण्याची मागणी आंदोलनाची मागणी म्हणून समोर आली.

**सरकारने चुकीचा निकष वापरून कर्जमुक्ती जाहीर केली आहे.शेतकऱ्यात लहान-मोठा असा भेद गरीब-श्रीमंत अशा संदर्भात करणे चुकीचे आहे. संपूर्ण शेतकरी समाज दारिद्र्यात जगतो आणि फरक आहे तो कोण कमी गरीब आणि कोण जास्त गरीब इतकाच. त्यामुळे संपूर्ण नाही तरी कमी-अधिक प्रमाणात का होईना कर्जमुक्तीचा लाभ सर्व शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे.**

इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ज्याप्रकारे संपाची



भूमिपुत्र वाहिनी, मांडगाव जि. वर्धा

चर्चा होती तसा हा संप झालेला नाही. आपल्या पुरते पिकवायचे आणि बाजारात न्यायचे नाही अशी संपाची कल्पना होती.रस्त्यावर न उतरता बांधावरूनच सरकारची कोंडी करायची आणि सरकारला झुकवायचे अशी ही कल्पना होती. शेतकऱ्यांनी असे केले तर निर्माण होणाऱ्या टंचाईचा अंदाज घेवून परप्रांतातून किंवा परदेशातून शेतीमाल मागविता येईल या भ्रमात सरकार होते आणि म्हणूनच सरकार पक्षाच्या प्रवक्त्याने उद्दामपणे शेतकऱ्यांनी संप केला तरी काही फरक पडणार नाही असे वक्तव्य केले होते. पण नियोजित संपा ऐवजी दूध, भाजीपाला आणि इतर शेतीमाल बाजारात पोचूच नये यासाठी आंदोलक शेतकरी रस्त्यावर उतरल्याने सरकार अडचणीत आले आणि येनकेनप्रकारे संप संपविण्यासाठी बाध्य झाले. मुख्यमंत्र्यांनी संप संपविण्यासाठी जे केले त्याबद्दल संताप व्यक्त होत असला तरी त्यात चुकीचे काहीच नव्हते.प्रत्येक आंदोलनात मध्यस्था करवी आंदोलकांना वाटाघाटीसाठी तयार करण्यात येतच असते. इथे तर त्यांच्या पक्षाचे आणि मातृसंघटनेचे लोकच सुकाणू समितीत असल्याने मुख्यमंत्र्यांनी त्यांना हाताशी धरून वाटाघाटी घडविल्या. आंदोलनाची सुकाणू समिती बनविताना सरकार धार्जिण्या लोकांना दूर ठेवण्याची जबाबदारी आंदोलकांची होती. अगदी संघाने लोक घुसविले हा आरोप मान्य केला तरी ती चूक सरकारची नसून आंदोलकाची आहे. ज्या बातम्या समोर आल्या आहेत त्यानुसार सरकार धार्जिण्या लोकांनीच सुकाणू समिती बनविण्यात पुढाकार घेतला आणि आंदोलकांनी तो घेवू दिला. यात आंदोलकाचा नवखेपणा आणि भाबडेपणा तेवढा समोर आला. नवख्या आणि भाबड्या आंदोलकांना वाटाघाटीत सरकारने गंडवले असेल तर त्यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. उलट मुख्यमंत्र्यांनी परिस्थिती हेरून आंदोलनाला प्रतिसाद दिला हा त्यांचा मुत्सद्दीपणा होता. शेतकऱ्यात व्याप्त प्रचंड असंतोषाची जाणीव नसल्याने आपल्या माणसा करवी हे आंदोलन संपविता येईल हा त्यांचा विचार मात्र चुकीचा आणि भाबडेपणाचा ठरला. आंदोलन संपविण्याचा त्यांचा प्रयत्न काहीसा अंगलट आला आणि आता ते आंदोलनास राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसची साथ आणि फूस असल्याचा आरोप करीत आहे. या पक्षांची आंदोलनास साथ किंवा फूस असण्यात गैर काहीच नाही. लोकांच्या समस्या सोडविण्यास सरकारला भाग पाडणे हे विरोधी पक्षांचे कर्तव्यच ठरते. स्वत: फडणवीस विरोधी पक्षात असताना आणि विरोधी पक्ष नेते असताना हेच करीत होते याचा त्यांना सत्ता मिळताच विसर पडलेला दिसतो. ज्यांनी सुकाणू समिती बनविली आणि ज्यांना हाताशी धरून वाटाघाटी झाल्यात ते तर संघ-भाजपचे असल्याचे उघड झाले. हे बघता कर्जमाफीचे श्रेय विरोधी पक्षांच्या यात्रांना मिळू नये यासाठीच संघ-भाजपच्या लोकांना घुसविण्यात आले असा आरोप कोणी केला तर तो खरा वाटेल. कारण मुख्यमंत्र्यांनीच आपल्या कृतीतून त्याचे पुरावे दिले आहेत.

प्रत्येकच आंदोलनात सरकार आणि विरोधीपक्ष एकमेकांवर आरोप करीत असतात. त्यात नवीन काही नाही. त्याकडे गंभीरपणे बघण्यापेक्षा आंदोलनाच्या मागण्यांकडे अधिक गंभीरपणे पाहण्याची गरज आहे. सरकार असो की विरोधी पक्ष या दोहोंच्या भूमिकांपेक्षा लोकांच्या नजरेस आला तो शेतकऱ्यांचा उद्वेग आणि उद्रेक. सरकारने जे देवू केले त्यापेक्षा आंदोलनाचे हे यश महत्वाचे आहे. त्यामुळे आता आंदोलन चालविण्यासाठी बनलेल्या नव्या सुकाणू समितीवर आंदोलनाला मिळालेले यश टिकवून अधिक मिळविण्याची मोठी जबाबदारी आहे.सुकाणू समितीत विविध विचारांची आणि मतांची आणि एकमेकांबद्दल आकस बाळगून असणारी कार्यकर्ते असल्याने त्यांच्यासाठी हे मोठे आव्हान आहे. आपसातील वाद आंदोलनावर हावी होवू द्यायचा नसेल तर एकमत असलेले मुद्दे विचारपूर्वक निश्चित करून तेच रेटले गेले पाहिजेत. प्राप्त परिस्थितीत शेतकऱ्यांवरील कर्ज ही गंभीर समस्या असून ती लवकर निकाली निघणे जरुरीचे आहे. हाच एक मुद्दा असा आहे यात दुमत होणार नाही.सरकारने नेहमीप्रमाणे छोटा शेतकरी-मोठा शेतकरी हा भेद समोर करून आपण गरिबांचे कैवारी असल्याचे दाखविण्याचा खटाटोप केला आहे. सरकारने कर्जमुक्तीची केलेली घोषणा फसवी आहे. रात्रीच्या अंधारात वाटाघाटी करण्यामागे आंदोलकांना फसविण्याचीच सरकारी नीती असल्याचे घोषणेवरून स्पष्ट होते. सरकारने आज जे शेतकरी थकबाकीदार आहेत त्यांचाच प्रामुख्याने विचार केला आणि त्यातही ५ एकरची मर्यादा घालून थकबाकीदाराची संख्या कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. ज्यांनी उसनवारी करून किंवा किडूकमिडूक विकून कर्जभरणा केला त्यानाही सरकारी घोषणेचा लाभ मिळणार नाही. म्हणजे सरकारी घोषणेचा लाभ ५ एकर खालील सगळ्या शेतकऱ्यांना देखील मिळणार नाही. एकरची मर्यादा टाकून कर्जमुक्ती देण्याचा एक मोठा तोटा असा आहे की त्यातून राज्यातील काही विभागावर अन्याय होतो. ओलीत अधिक असलेल्या प.महाराष्ट्रात जमीन धारणा कमी आहे आणि जास्त कोरडवाहू असलेल्या मराठवाडा आणि विदर्भात जमीन धारणा अधिक आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेचा लाभ प.महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विदर्भ-मराठवाड्याच्या तुलनेत जास्त होईल. एकूणच मुख्यमंत्र्याची कर्जमुक्तीची घोषणा फसवी आणि अन्यायकारक आहे आणि म्हणून मान्य होण्यासारखी नाही.

मुळात सरकारचा निकषच चुकीचा आहे. लहान-मोठा शेतकरी हा जो भेद आहे तो श्रीमंतीच्या संदर्भात नसून दारिद्र्याच्या संदर्भात आहे.शेतकऱ्यात गरीब-श्रीमंत अशी वर्गवारी करणे ही समाजवादी विकृती आहे. शेतकऱ्यात भेद असलाच तर तो कमी गरीब आणि अधिक गरीब असाच आहे. संपूर्ण समाजाचे जीवनमान खालावलेले आहे हे सत्य समाजमान्य होत नाही व त्याचाच लाभ सरकार घेत आहे. छोट्या शेतकऱ्यांना पुढे करून कर्जमुक्तीसाठी ५ एकर पर्यंतची जी मर्यादा घातली ती चुकीची

आहे. शेतकऱ्यात दारिद्र्य जसे कमी जास्त आहे ते लक्षात घेवून देण्यात येणाऱ्या कर्जमुक्तीचा लाभ सगळ्याच शेतकऱ्यांना कमी-अधिक प्रमाणात झाला पाहिजे. असे व्हायचे असेल तर सरकारने एकरची अट टाकण्या ऐवजी कर्जमुक्तीची रक्कम निश्चित केली पाहिजे. समजा सरकारने सर्व शेतकऱ्यांचे १ लाखापर्यंतचे किंवा छोट्या शेतकऱ्यांवर सरासरी किती हजाराचे कर्ज आहे हे लक्षात घेवून ती रक्कम निश्चित करावी आणि कर्जातील तेवढी रक्कम सर्वच शेतकऱ्यांवरील बोज्यातून कमी केली तर छोटा शेतकरी संपूर्णपणे कर्जमुक्त होईल आणि तुलनेने कमी गरीब असलेल्या शेतकऱ्यांच्या डोक्यावरील ओझे देखील हलके होवून त्यालाही दिलासा मिळेल. खरे तर सगळ्या शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी न्याय्य आहे , पण सरकारला आपली आणि नोकरदार वर्गाची चैन सोडणे शक्य नसल्याने संपूर्ण कर्जमाफी न्याय्य असली तरी व्यावहारिक नाही हे लक्षात घेवून जास्तीतजास्त कर्जमुक्तीची रक्कम सरकार बरोबरच्या वाटाघाटीतून निश्चित करण्याची आणि सर्व शेतकऱ्यांवरील तेवढा कर्जाचा बोजा कमी होईल हे पाहण्या ची जबाबदारी आंदोलनाच्या नव्या सुकाणू समितीवर आहे.

शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आहेत. ते बिकट आणि गुंतागुंतीचे आहेत. एकाच आंदोलनातून ते सुटण्यासारखे नाहीत आणि काही तर कोणत्याही आंदोलनातून सुटण्यासारखे नाहीत. शेतीमालाला किफायतशीर किंमत हा शेतकऱ्यांचा सर्वात मोठा प्रश्न आंदोलनातून सुटण्यासारखा नाही. त्यासाठी स्वत: शेतकरी समूहाला बऱ्याच गोष्टी कराव्या लागतील आणि सरकारलाही. आज शेतकऱ्यांच्या विरोधात व्यापार शर्ती आहेत. त्या हटविण्यासाठी सरकारवर दबाव आणण्यात आंदोलनाचा उपयोग होईल. एकदा का अन्यायकारक व्यापार शर्ती दूर झाल्या की शेतकऱ्यांना स्वत: बाजारात उभे राहून आपल्या मालाची किंमत वसूल करावी लागणार आहे. हे लक्षात न घेतल्याने शेतकऱ्यात स्वामिनाथन आयोगाचे मोठे आकर्षण आहे.हमीभाव अधिक ५० टक्के नफा ही आयोगाची शिफारस आकर्षक असल्याने डोळे झाकून स्वामिनाथन आयोगाच्या अंमलबजावणीची मागणी होत आहे. स्वामिनाथन आयोग अभ्यासला म्हणजे आपल्या लक्षात येईल की शिफारसीत नवीन असे काही नाही. या आयोगाच्या शिफारसी म्हणजे नव्या बाटलीत जुनीच दारू आहे. पूर्वी किफायतशीर किंमतीची मागणी व्हायची त्यात नफा गृहीतच होता. फक्त नफा ५० टक्के असावा असे सांगत ही मागणी आयोगाने नव्या वेष्टनात समोर केली आहे. आयोगाने १०० टक्के नफा मागितला असता तर मागणी जास्तच आकर्षक झाली असती.मुळात अशा प्रकारचा नफा बाजारात माल विकून कसा मिळवायचा याचे कोणतेही व्यावहारिक सूत्र आयोगाने दिले नाही. याचा अर्थ सरकारने एवढा नफा देवून माल विकत घेणे असा होतो. हे पूर्णत: अव्यावहारिक आहे. सरकारचा तूर खरेदीतील गोंधळ लक्षात घेतला तर सरकारच्या आवाक्याबाहेरची ही गोष्ट आहे. बाजारात माल पुरवठा नियंत्रित करूनच नफा शक्य आहे. शेतकरी संपाच्या कल्पनेत हे निहित आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनाच आपल्या व्यावसायिक संघटना उभ्या करून भाव ठरविण्याचा अधिकार स्वत:कडे घ्यावा लागेल. स्वामिनाथन आयोग मात्र शेतकऱ्यांचे सरकारवरील अवलंबन वाढविणारा आहे आणि सरकारवरील अवलंबन हे भ्रष्टाचाराला वाव देणारे आणि शेतकऱ्यांना लाचार करणारे ठरेल. शेतकऱ्यांकडची जमीन धारणा किफायतशीर शेतीसाठी मुळीच परवडणारी नाही याचा अनुभव आपण घेत आहोत. शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येचा भार शेतीला सहन होत नाही हे सर्वमान्य असताना स्वामिनाथन आयोग पुन्हा सिलीगच्या अंमलबजावणीची आणि अधिक लोकांना शेतीचे तुकडे देण्याची शिफारस करतो. ज्या कारणाने शेतीचे वाटोळे झाले तेच करायला स्वामिनाथन आयोग सांगतो. तेव्हा शेतकऱ्यांनी आणि शेतकरी आंदोलनाने स्वामिनाथन आयोगाच्या भ्रमजालातून बाहेर येण्याची गरज आहे.त्यातून बाहेर आल्या शिवाय शेती मालाच्या किफायतशीर किंमतीचा प्रश्न सोडविण्याचा मार्ग सापडणार नाही.

**- सुधाकर जाधव**
**पांढरकवडा , जि. यवतमाळ**
**मोबाईल - ९४२२१६८१५८**

♦ ♦ ♦

*एका माणसाने दुसऱ्यासाठी करुणेपोटी काम करावे हे दोघांनाही घातक आहे, असे मी मानतो. मी जर सुरुवातीलाच डो यातून पाण्याचे चार थेंब गाळीत मांडणी केली असती तर मला खात्री आहे मी आतापर्यंत महात्मा या पदवी पर्यंत पोहोचलो असतो, हे मी जाणीवपूर्वक टाळीत आलो...*

*दु:ख आणि यातना सोसून मी केवळ दुसऱ्याच्या भल्याकरता हे दिव्य करतो आहे असे कोणी म्हटले की मा मनात भीतीच्या घंटा वाजू लागतात. असे म्हणणारा निरोगी मनाचा नाही असे मला वाटू लागते. सभेत सांगतात शरद जोशी पगार सोडून शेतकर्यांदची कीव आली म्हणून आले पण मी करुणेच्या पोटी आलेलो नाही .सत्यशोधनासाठी आलो आहे. याम फक्त आनंद मिळतो म्हणून काम करतो आहे. हा आनंद जोपर्यंत वाटणार आहे तोपर्यंत मी काम करणार आहे.*

**- युगात्मा शरद जोशी**

# संपाची वाताहत हा चुकीच्या मागण्यांचा परिणाम - अनिल घनवट

## (राजकीय हस्तक्षेपामुळे शेतकरी संघटना संपातून बाहेर)

**श्रीगोंदा :** चुकीच्या मागण्यांमुळे व अनुभव व अभ्यासहीन नेतृत्वामुळे यशस्वी झालेल्या शेतकरी संपाचा शेवट विदारक होताना दिसत आहे. आता राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी विरोधी पक्ष संपात उतरल्यामुळे संपाला हिंसक वळण लागण्याची शक्यता आहे. शेतकरी संघटना आणखी शेतकऱ्यांच्या मुलांचा बळी देऊ इच्छित नाही. शेतकरी संघटना या संपातून आता बाहेर पडत आहे.

संपाच्या पहिल्या बैठकीपासूनच शेतकरी संघटनेने संपकऱ्यांच्या मागण्यांबाबत नाराजी व्यक्त केली आहे. अनेक वेळा मागण्या दुरुस्त करण्याची विनंती करूनही संपाच्या नेत्यांनी संघटनेचा प्रस्ताव धुडकावून लावला. असे असले तरी सर्व शेतकरी एकत्र आला तर काय चित्र तयार होऊ शकते याचा अंदाज घेण्यासाठी कर्जमुक्तीला साथ देत संपाला पाठिंबा दिला. शेतीमाल रोकण्याचे आंदोलन फार दिवस चालविता येणार नाही म्हणून ५ ते ७ दिवसाचे टोकन आंदोलन यावर्षी करून शासनाला एक वर्षाची मुदत देऊन संपूर्ण कर्जमुक्तीसाठी करावे लागणारे कायद्यातील बदल व संरचनेसाठी निधी व्यवस्थापनासाठी लागणारा वेळ द्यावा अशी सूचना दि. १० मेच्या पुणे येथील बैठकीत केली होती. ती कानामागे टाकली.

आंदोलन सुरू करणे सोपे असते, थांबविणे कठीण असते म्हणून नेमकी कुठल्या मुद्यावर कशी तडजोड करायची हे आताच ठरवावे असे दि. १७ मे रोजी औरंगाबाद येथील बैठकीत सांगितले होते ते गांभीर्याने घेतले नाही. २ जून रोजी पुणतांबा येथे झालेल्या शेवटच्या बैठकीत सर्व शेतकऱ्यांचे सध्या थकित असलेले कर्ज माफ करावे व कर्जमुक्तीसाठी आवश्यक बदल करण्यास एक वर्षाचा वेळ द्यावा अशा तडजोडीचा प्रस्ताव ठेवला तो ही धुडकावून लावला आहे.

सर्व शेतकऱ्यांची एकजूट झाली तर किती ताकद तयार होते याचा अंदाज घेण्यासाठी, इच्छा नसताना चुकीच्या मागण्यांना पाठिंबा देत संघटना आंदोलनात उतरली व पूर्ण ताकदीने उतरून संप यशस्वी करून दाखवला. इतर राज्यातील शेतकरी संघटनांशी संपर्क साधून तिकडेही आंदोलन छेडले. परंतु या संपाचे नेतृत्व ज्यांनी स्वतःच्या ताब्यात घेतले त्यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकूण घेतले नाही. प्रसार माध्यमांपुढे येऊ दिले नाही. मंचावर मुक्तपणे बोलू दिले नाही तरीही संघटना संपकऱ्या बरोबर प्रामाणिकपणे राहिली.

संपकऱ्यांच्या मागण्यात शासनाच्या शेतकरी विरोधी धोरण बदलण्याचा कुठेही संबंध नाही. हे धोरण बदलल्या शिवाय कितीही वेळा कर्जमाफी केली तरी शेतकरी कर्जबाजारीच राहणार आहे. शेतकऱ्यांची कर्ज फेडायची ऐपत यावी अशी धोरणे तयार करणे आवश्यक आहे. त्या शिवाय पर्याय नाही. शेतकऱ्यांना व्यापाराचं व तंत्रज्ञानाचं स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय मार्ग नाही पण या चमकोगिरी करणाऱ्या नेत्यांना यातले काहीच समजत नाही व समजून घ्यायला तयार नाहीत.

या संपाची उपलब्धी एकच की शेतकरी एक झाले तर काय होऊ शकते याची झलक देशाला पहायला मिळाली. संप थांबवला नाही तर हाकनाक शेतकऱ्यांच्या बळी जाण्याची शक्यता आहे. संप मागे घेतल्याची घोषणा झाल्यानंतर पुन्हा शेतकऱ्यांना थांबविणे अवघड असते. सरकार संप चिरडण्यासाठी कठोर पाऊले उचलते. सरकारची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता यापेक्षा जास्त काही मिळेल असे वाटत नाही. आता शेतकरी संघटनेला चुकीच्या मागण्यांसाठी कार्यकर्त्यांना रस्त्यावर उतरवण्यात रस नाही. म्हणून संघटना या संपातून बाहेर पडत आहे.

खा. राजू शेट्टी आंदोलनात सक्रिय होत आहेत. या राजू शेट्टी यांनी शरद जोशी असताना ऊसाची १३००/- रु. ची मागणी असताना राजू शेट्टी यांनी ९८०/- अधिक ३२०/- रु. अशी तडजोड करून आंदोलन तोडले होते. त्यानंतर प्रत्येक वेळेला त्यांनी सरकार व साखर सम्राटांशी हात मिळवणी करून शेतकऱ्यांना धोका दिला आहे. त्यांच्या बरोबर शेतकऱ्यांनी जाऊ नये.

शेतकरी संघटना या संपातून बाहेर पडत आहे व यापुढे शरद जोशी यांनी केलेल्या शिफारशी लागू करण्यासाठी व शेतकऱ्यांना व्यापाराचे स्वातंत्र्य, तंत्रज्ञानाचे स्वातंत्र्य, शेती विरोधी कायदे व सरकारचे शेती विरोधी धोरण बदलण्यासाठी प्रयत्नशील राहील.

**अनिल घनवट**
**अध्यक्ष**
**शेतकरी संघटना**

♦ ♦ ♦

प्रतीक्षा **पावसाळ्याची** जिवाला डागण्या देते;
**ढगांना काय चाटावे... मनाचा मोर मेल्यावर!...**
**– रवी चापके.**

*****

***मी काल पेरलेले, उकरुन आज आलो !***
***बरबाद का करू मी, बहमोल कण भुकेचे ..***
**– पुरुषोत्तम वराडे**

# शेतकरी-हिताविरुद्ध तडजोड व तत्त्वहीन माघारीचा निषेध

१ जून २०१७ रोजी शेतकऱ्यांनी पुकारलेल्या संपाला शेतकरी संघटनेने पाठिंबा दिला होता, तथापि कर्जमुक्ती (कर्जमाफी नव्हे) सोडता किसान क्रांतीची इतर कोणतीही मागणी शेतकरी संघटनेला पूर्णत: मान्य नव्हती. तरीही शेतकरी एकजूट होते आहे या कारणासाठी तात्त्विक मुद्दे सोडून संघटनेने पाठिंबा दिला. या निमित्ताने शेतकरी संपाची डोळे दिपवणारी ताकद पाहायला मिळाली आणि २-३ दिवसात शासन शरण आले असते व योग्य तोडगाही निघाला असता. परंतु किसान क्रांतीच्या काही नेत्यांनी वैचारिक दौर्बल्य व कचखाऊ रणनीती दाखवून एकूण शेतकरी चळवळीला खाली पाहायला लावले असेच खेदाने म्हणावे लागते. अनभ्यस्तपणे आपल्या मागण्या पुढे करणारे अपरिपक्व नेतृत्व या संपाला लाभले होते. त्यामुळे संपाच्या भवितव्याची शेतकरी संघटनेला काळजी वाटतच होती. शासनाने काहीही न देता मोठा संप मोडून दाखविला यात मुख्यमंत्र्याची चलाख व शेतकरी विरोधी खेळी यशस्वी झाली असे दुर्दैवाने म्हणावे लागते. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती हीच सर्व प्रथम घोषणा व नंतरच चर्चा अशी रणनीती असायला हवी होती परंतु तसे काही झाले नाही.

अल्पभूधारक शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार (अंमलबजावणी चार महिन्यात), दुधाची दरवाढ (२० जून नंतर), नाशवंत उत्पादनांसाठी शीतगृह व प्रक्रियाउद्योग (शेतकऱ्यांच्या कंपन्यांमार्फत उभारणार), आंदोलनातील गुन्हे मागे घेणार, राज्य कृषी मूल्य आयोगात सुधारणा, हमी भावापेक्षा कमी किमतीने खरेदी केल्यास व्यापाऱ्यांवर गुन्हे अशी किरकोळ व हास्यास्पद आश्वासनांवर संप मागे घेण्यात आला आहे. संप सर्व शेतकऱ्यांनी पुकारला होता व मूठभर नेत्यांनी मागे घेतला हे संघटनेला मान्य नाही. शेतकरी प्रश्न व शेतकरी आंदोलन यशाच्या शिखरावर असताना या नेत्यांनी किरकोळ मुद्द्यावर तडजोड करत माघार घेतली आहे. धोरणात्मक बदल घडविण्याच्या दृष्टीने कुठलीच चर्चा झालेली दिसत नाही. स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी, फुकट वीज, पेन्शन, हमी-भाव आदी मागण्या समाजवादी आर्थिक कार्यक्रमाचा भाग असून निरर्थक आहेत आणि यामुळे शेतकरी समाज नवा वेठबिगार होईल, त्यामुळे किसान सभेच्या अशा मागण्यांनादेखील आम्ही विरोध करतो आहोत.

कालच्या बैठकीला अध्यक्ष अनिल घनवट हजर नव्हते, कारण महाराष्ट्रासमोर संघटनेची भूमिका मांडण्यासाठी एबीपी वाहिनीवर त्यांना निमंत्रित केले होते. दिलेली आश्वासने तरी हे सरकार किती व कशी पाळते हे पाहून मग संघटनेची पुढील आंदोलनाची दिशा ठरवावी लागेल. संप मागे घेतल्याची घोषणा झाल्या नंतर आंदोलन चालू ठेवणे अवघड असते. संघर्ष होतो. आणखी गुन्हे अंगावर घेण्यापलीकडे काही पदरात पडणार नाही म्हणून सर्व कार्यकर्त्यांनी दूध-भाजीपाला अडवणे आता बंद करावे असे संघटनेच्या वतीने निवेदन करण्यात येते आहे. शेतकरी संघटनेची धोरणात्मक लढाई चालूच राहणार आहे, यासाठी शरद जोशी प्लान वर आधारित आपले पुढील मुद्दे कायम राहतील:

(१) सर्व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती व थकीत वीजबील-मुक्ती (त्यासाठी आपण मा. मुख्यमंत्री यांना पूर्वीच निव्वळ मुद्दलासाठी -१० वर्षे मुदत आणि सर्व व्याज-सरकारने भरावे असा मार्ग सांगितला आहे) मुद्दल भरण्यासाठी पुढील अटी असतील.

(२) शेतकऱ्यांवर वरवंटा फिरवणारा आवश्यक वस्तू कायदा रद्द करणे किंवा या कायद्यातून शेतमाल वगळणे.

(३) कमाल-शेतजमीन-धारणा कायदा रद्द करणे, जमीनवापर कायदे व यंत्रणा स्वच्छ व पारदर्शक करणे.

(४) शेतमालासंबंधी आयात-निर्यात बंधने काढून मुक्त-राष्ट्रीय बाजारासाठी सर्व मार्ग खुले करणे. पशू-व्यापारावरचे निर्बंध पूर्णपणे उठवणे.

(५) जीएम धरून शेतीसाठी सर्व तंत्रज्ञान वापरण्यास, संशोधनास स्वातंत्र्य देणे.

(६) ग्रामीण संरचना (पाणी-वीज-रस्ते-प्रक्रिया) यात सरकारी व खाजगी गुंतवणूक वाढवण्यासाठी कायदेशीर व व्यावहारिक वातावरण निर्माण करणे, प्रकल्प व रस्त्यांसाठी योग्य किंमत तडजोड करणे.

**– रवी काशीकर, अध्यक्ष, शेतकरी संघटना न्यास, आंबेठाण**
**– गोविंद जोशी, कार्याध्यक्ष, शेतकरी संघटना न्यास, आंबेठाण**
**– अनिल घनवट, अध्यक्ष, शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य**

*उजवण्याला या धरेची कूस आधी.*
*लाव थोडी पावसाला फूस आधी...*

**– वीरेंद्र बेडसे**

*******

*दोष कुणाला देऊ की स्वतःच फाशी घेऊ*
*ह्या पेरल्या बिजांच जर दाणे झाले नाही*

**– किशोर मुगल**

*******

*समजू नको ढगा हे साधेसुधे बियाणे*
*मी पेरले पिलांच्या चोचीमधील दाणे*

**– आबेद शेख**

# शेतकऱ्यांचा संप : माघार की फूट



मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा केल्यानंतर सरकारी आश्वासनांवर भरवसा ठेवून सरकार शेतकऱ्यांचे पाठीशी खंबीर आहे, या साक्षात्कारा नंतर पुणतांब्यांच्या शेतकऱ्यांनी संपातून माघार घेतली. ते तसं करतील असं भाकीत अनेकांनी वर्तविले होते.

मृग नक्षत्राचं पहिलं पाणी पडल्या नंतर या संप करणाऱ्यांचा कस लागणार होता, कारण शेतकरी यंदा तरी पिकेल या आशेवर जगत आलाय. आमच्याकडे एक म्हण आहे, 'एक कव्वं पिकवीन बाई त्यालेच पानी घालीन बाई.'

संपावर जाणार म्हटल्यानंतर हे गांव चर्चेत आलं, साऱ्या मिडियाचे कॅमेरे तिथंच लकलकायला लागले. यातून इतरांनाही स्फुरण चढलं व आधी तू की मी करीत अनेक वाड्या-वसत्यांनी यात उड्या घेतल्या. शेतकऱ्यांनी स्वत: पुरतं पिकवलं म्हणजे सरकार वठणीवर येईल, त्यातून लुटीचा आलेख घसरेल ही भूमिका मा. शरद जोशींनी १९८४ साली परभणीच्या अधिवेशनात मांडली पण शेतकऱ्यांनी त्या अर्थशास्त्रीय सल्ल्याकडे दुर्लक्ष तर केलंच उलट एका दाण्याचे शंभर दाणे करणारा शेतकरी एकाचे हजार करायला लागला, इंच इंच पिकवू लागला. आपल्या शेतातून दुसऱ्याचेही शेतात घुसून पेरणारेही अनेक.

हरीत क्रांतीनंतर पीएलओ ४८० च्या जोखडातून देश सुटला, पण शेतकऱ्यांची हालत पिकवुनिया उपाशी अशी झाली. अधिक उत्पादनाचे नादात कर्जाचा डोंगर वाढत गेला, जमिनही त्यातील मायक्रो न्यूट्रिंयंट संपवल्यामुळे पिकेनाशी झाली, इतरांचीही देणी थकली, त्यामुळे निराशेच्या गर्तेत सापडलेला समाज आत्महत्येच्या खाईत लोटला गेला. यातून पर्याय शोधण्याची धडपड सुरू झाली रासायनिक शेतीच्या काळात रासायनिक खतांमधील कंटेंट सांगा म्हणणारे एकदम फुकूओकाला गुरुस्थानी ठेवून नैसर्गिक शेतीच्या मार्गी लागले, हताश शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांना उद्धारण्यासाठी संत, महात्म्यांची एक जमातच तयार झाली. सगळे प्रयोग करून शेतकरी थकले भागले तरी हाती काहीच उरले नाही.

शेतीत काहीही पेरा व कशीही करा, तरी देणी देता देता नाकी नऊ, फिटता फिटेना अशी अवस्था, यातून संपाची संकल्पना पुढे आली. पण वेळ निघून गेलेली. आज देशातच ३-४ वर्ष पुरेल एवढा अन्न-धान्याचा बंपर स्टॉक शिल्लक आहे, जगातील विकसीत राष्ट्रे उत्पादनाच्या बाबतीत आपल्या कित्येक पटींनी पुढे गेलेली आहेत. उदाहरणच द्यायचं झालं तर ब्राझील मध्ये एकरी ३५ क्विंटल सोयाबीन होते. असे देश बाजारपेठ काबीज करण्यासाठी, शेतकऱ्यांना सबसिडी, वाहतुकीवर सबसिडी व माल घेणाऱ्या देशातील दलालांना, पुढाऱ्यांना, संबंधितांना भरपूर अहेर करून गरीब देशांच्या बाजारपेठा काबीज करतात. या स्पर्धेत आपण कोठे आहोत याचा विचार न केलेला बरा. या सर्व बाबींचा विचार करता संपाचे हत्यार कितपत प्रभावी ठरेल याचा विचार घोषणा व्हायच्या आधीच केला असता तर.....

१९९४ साली चाकण जवळ भूमी अधिग्रहणाचे विरोधात शेतकरी संघटनेने ठिय्या दिला होता, त्यावेळी शरद पवारांनी चर्चेकरिता मा. शरद जोशींना न बोलवता संबंधीत शेतकऱ्यामधील उतावीळांना हेरले, त्यातील काही नग शरद पवारांसोबत चर्चा करायला निघून गेले, आता त्या सर्वसामान्य माणसांनी पवारांसारख्या बलाढ्य शक्ती समोर तिथल्या स्वप्नवत वैभवाला पाहून स्तंभित झाल्यावर तोंड तरी उघडलं असेल काय ?

तोच कित्ता चाणाक्ष फडणविसांनी गिरवला.

**– सतीष देशमुख**
**पणज**

# स्वामिनाथन आयोग म्हणजे शेतीसाठी भुलभुलैय्या!

जूनच्या महिन्यात शेतकऱ्यांनी संप पुकारला आणि कर्जमाफी सोबत स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची मागणी पुढे आली. २००८ साली फार मोठी कर्जमाफी दिलेली असताना दहा वर्षांच्या आतच देशातले शेतकरी पुन्हा कर्जमाफी मागत आहेत. यावरून हे स्पष्ट होते की शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे उत्तर कर्जमाफी नाही. मग स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याने शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील का? याचा विचार करण्यासाठी आयोगाच्या शिफारशींचा अभ्यास करणे उचित ठरेल.

२००४ साली मनमोहन सरकारने या आयोगाची नेमणूक केली. आयोगाने आपला अहवाल २००६ सालीच सरकारला दिला. त्या नंतर त्या अहवालाकडे दुर्लक्ष करणारे तेव्हा सत्तेत असणारे पक्ष आज त्याच आयोगाची अंमलबजावणी करा असा आग्रह धरतात, तो पाहून राजकीय पक्षांचा स्वार्थी हेतू स्पष्ट होतोच, पण सोबत आयोगाचे नेमके काम काय होते, याचा शोधही घ्यावा वाटतो.

अहवालाची सुरुवात महात्मा गांधींच्या वचनाने होते. त्याच्या खालीच नेहरूंचे वचन उद्धृत करण्यात आलेले आहे. पुढे हरित क्रांतीचा उल्लेख आहे आणि हरित क्रांतीच्या सन्मानार्थ इंदिरा गांधींनी काढलेल्या पोस्टाच्या तिकिटाचा उल्लेख इंदिराजींच्या नावासह आहे. पण हरितक्रांती यशस्वी करण्यात लाल बहादूर शास्त्री यांनी बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा उल्लेखही नाही! येवढेच नाही तर ज्या शरद जोशींनी शेती तोट्याची का? याचे शास्त्रशुद्ध विश्लेषण करून त्या विषयावर प्रचंड अभ्यास आणि लिखाण केलेले आहे. त्या शरद जोशींचे मत विचारात घेणे गरजेचे होते. पण शास्त्रीजींचे नाव जसे आयोगाने टाळले तसेच आयोगाने शरद जोशींसारख्या तज्ज्ञाचा सल्लाही नाकारला. आयोगाचा हेतू शेतकऱ्यांचे भले करणे हा नसून मनमोहन सरकारच्या शेती विषयक धोरणाची भलामण करणे हाच होता, असे खेदाने म्हणावे लागते कारण तज्ज्ञांशी सल्ला मसलत न करणारा आयोग शेतकऱ्यांचे नष्टचर्य संपवण्यासाठी खात्रीचा उपाय न सुचविता वरवरचेच उपाय सुचवितो.

अनेक विरोधाभासांनी भरलेला असा हा अहवाल आहे. १.१ मध्ये नेहरू-गांधी यांची आरती केल्यावर १.२.१ मध्ये हा अहवाल सरकारी योजनांची भलामण करतो. सरकारने शेतकऱ्यांसाठी काय काय केले ते विशद करतो. आणि विरोधाभास असा की सरकारची धोरणे जर योग्य दिशेने जाणारी असली असती तर शेतकऱ्यांवर लाखांनी आत्महत्या करण्याची वेळच आली नसती! पण सरकारी मर्जी राखण्यासाठी अहवाल सादर करणाऱ्या भटांना ही भलामण करणे तर भागच आहे.



पुढे १.२.३ आणि १.२.४ मध्ये हा अहवाल १९८०-८५ मध्ये ५.७% असलेला कृषी विकासाचा दर घसरून १९९५-२००० मध्ये २% येवढा झाला याची कबुली देतो. ८०-८५ दरम्यान विकास दर जास्त असल्याचे श्रेय सिंचनावर केलेल्या भरघोस तरतुदीला देतो. मग पुढे ही तरतूद कमी कुणी केली? का केली? सिंचन का नाही वाढले? भूजल पातळी का कमी होत गेली? या सर्व प्रश्नांवर मूग गिळून गप्प बसतो.

१.२.४ मध्ये हा अहवाल हे सांगतो की शेती मधून फारसा रोजगार निर्माण होत नाही. त्यावर उपाय काय तर शेतीचे यांत्रिकीकरण कमी करून शेतीच्या कामात मानवी श्रमांचा जास्त वापर व्हावा असे सुचवितो! आणि याच अहवालात या आधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे कौतुक केलेले आहे. इथे विरोधाभास असा की सरकारने राबविलेल्या ग्रामीण रोजगार हमी योजना आणि स्वस्त धान्य योजना यांमुळे शेतीचे काम करण्यास मजूर मिळेनासे झाले किंवा मजुरी वाढत गेली. त्याचा विपरित परिणाम शेतीच्या उत्पन्नावर झाला. शेतीसाठी लागणारा मजूर महाग करून शेतीतले यांत्रिकीकरण कमी करून शेती मध्ये मनुष्यबळाचा वापर वाढावा अशी अपेक्षा करणारा हा अहवाल म्हणजे शेतकऱ्याची क्रूर थट्टा नाही तर दुसरे काय? आणि तशी अपेक्षा म्हणजे या अहवालातला दुसरा विरोधाभास. पुढे हाच अहवाल ग्रामीण भागात पायाभूत सुविधा वाढवण्याचा उल्लेख करतो. तेवढा मात्र स्वागतार्ह आहे.

१.४.२ मध्ये जमीन विषयक मुद्द्यांचा विचार केलेला आहे. १.४.२.३ मध्ये शेती योग्य जमीन बिगर शेती कारणासाठी वापरली जाऊ नये असे सुचविण्यात आले आहे. म्हणजे कर्जाच्या ओझ्या खाली दबलेल्या शेतकऱ्याला शहरीकरणाच्या रेट्यामुळे आपली शेतजमीन विकून दोन पैसे खिशात घालण्याची जी संधी मिळते ती नाकारण्याचेच पाप हा अहवाल करतो. शेतजमिनीचा कसा उपयोग करायचा हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार केवळ शेतकऱ्याला असावा. शहरातल्या मोकळ्या जागेवर काय बांधायचे हे ठरविण्याचा पूर्ण अधिकार जमीन मालकाला असतो. शेतकऱ्याने मात्र शेतजमिनीचा नफा देणारा दुसरा काही उपयोग करायचे ठरविले तर त्यास बंदी? आणि म्हणून ही सूचना अन्यायकारक असून धुडकावून लावली पाहिजे.

१.५.१०.१ मध्ये अन्न सुरक्षेचे छत्र सर्वांना पुरविण्याची शिफारस केलेली आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये होणारा भ्रष्टाचार पाहता ही व्यवस्थाच वेगळ्या प्रकारे राबविणे गरजेचे

आहे आणि त्यात सुधारणा करण्यासाठी लाभार्थ्यांना रोख लाभ थेट देण्याचा विचार होत असताना त्याच भ्रष्ट, अकार्यक्षम प्रणालीच्या माध्यमातून जास्तीचे धान्य वितरण करण्याची शिफारस गरिबांना अन्न सुरक्षा देणारी नसून भ्रष्टाचाराला संधी देणारी आहे असे म्हणावे लागते.

पुढे मार्केट इंटरव्हेंशन स्कीम' राबविण्यासंबंधी उल्लेख आहे. ती कसे काम करते ते पाहू. जेव्हा शेतमालाचे भाव खूप वाढतात तेव्हा ग्राहक नाराज होतो. म्हणून सरकार ज्याचा भाव वाढला आहे असा शेतमाल आयात करते किंवा आपल्या जवळचे साठे बाजारात आणते आणि भाव पाडते. अर्थातच शेतमालाचा भाव पडल्यामुळे ग्राहक जरी सुखावला तरी शेतकऱ्याचे मात्र नुकसानच होते. याची उलटी बाजू बघू. २०१६-१७ या हंगामात तुरीचे उत्पादन जास्त झाले आणि भाव पडले. खुल्या बाजारातला भाव हमी भावापेक्षा कमी होता. मग अर्थातच शेतकऱ्यांनी सरकारी तूर खरेदी केंद्रासमोर रांगा लावल्या. तुरीने भरलेले किरायाचे वाहन १०-१५ दिवस रांगेत उभे करणे धोक्याचे होते नी शेतकऱ्याला परवडणारेही नव्हते. मग अर्थातच अनेकांनी आपली तूर खाजगी व्यापाऱ्यांना ३२००-३८०० दराने विकली. सर्वात खेदाची गोष्ट म्हणजे अशा रीतीने शेतकऱ्याची तूर व्यापाऱ्याच्या हाती पडल्यावर सरकारने तुरीवरची साठवणूकी संबंधीचे बंधने काढून टाकली. शेतकऱ्यांना रांगेत उभे करणाऱ्या सरकारने व्यापाऱ्यांना मात्र टोकणं दिली आणि व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची तूर चढ्या भावात घेतली. भारतीय तुरीला बाहेरच्या देशात मोठी मागणी आहे. तुरीची निर्यात खुली केली तर आजही तुरीला खुल्या बाजारातच चांगला भाव मिळू शकतो. सरकारला नुकसान सोसून बाजार भावापेक्षा जास्त भावाने तूर खरेदी करण्याची गरज नाही! पण विक्रमी उत्पादन झाले तरीही तुरीची निर्यात खुली करण्याची हिंमत सरकार दाखवत नाही! आणि नेमके हेच वास्तव आहे मार्केट इंटरव्हेंशन स्कीम' चे. ही स्कीम केवळ ग्राहकाचे हित बघते, शेतकऱ्याचे नाही. स्वामिनाथन आयोग केवळ या स्कीमचा उल्लेख करतो आणि गप्प बसतो. या स्कीमची वाईट बाजू उघडी करत नाही. म्हणून सरकारच्या चालू असलेल्या योजनांची भलामण करण्यासाठीच हा अहवाल आहे का? या संशयास पुष्टी मिळते.

१.५.१०.३ मध्ये हा अहवाल परदेशातल्या यांत्रिकीकरण झालेल्या आणि अत्याधुनिक पद्धतीने चालणाऱ्या शेतीच्या स्पर्धेत मानवी श्रमाच्या बळावर चालणारी भारतीय शेती कशी टिकेल अशी चिंता व्यक्त करतो. आणि खेड्यातला रोजगार कमी होईल असे काही करू नये असेही सांगतो. या अहवालातला हा अजून एक विरोधाभास. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की आधुनिक तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरणाची कास धरल्यामुळे परदेशातली शेती जास्त किफायतशीर असून तिच्याशी स्पर्धा आपल्या शेतकऱ्यांना करता येणार नाही असे सांगतानाच तिला सक्षम न बनविता देशातली शेती ही जास्तीत जास्त मानवी बळांवर आधारित राहावी असेही पुढे सुचविलेले आहे. म्हणजे आपली शेती अशीच मागास राहावी असे स्वामिनाथन यांना वाटते का?

१.५.१०.७ मध्ये शेतकऱ्यांना खोटी आशा दाखवणारी शिफारस आहे. ज्यात आधारभूत किंमत ही सरासरी उत्पादन किमतीच्या' ५०% पेक्षा जास्त असावी अशी शिफारस आहे. आणि इथेच खरी मेख आहे. गुजरातेत कापसाचे एकरी उत्पादन महाराष्ट्राच्या दुप्पट आहे. त्यामुळे तिथला उत्पादन खर्च अगदी कमी. आणि अशा रीतीने जिथे उत्पादन जास्त आहे तिथल्या खर्चासोबत कमी उत्पादकता असलेल्या भागातल्या उत्पादनाची सरासरी काढल्यामुळे समोर येणारा उत्पादन खर्च हा प्रत्यक्षात असलेल्या खर्चापेक्षा कमी असेल! आणि त्याच कारणाने उत्पादन खर्चावर ५०% नफा' देणारी शिफारस ऐकताना जेवढी आकर्षक वाटते तेवढी ती असणार नाही! पण सर्वच तज्ज्ञ' या विषयावर मूग गिळून चूप आहेत! याच्याही पुढे जाऊन लक्षात घेण्याचा मुद्दा असा की मुळात उत्पादन खर्च काढण्याची सरकारी पद्धत सदोष आहे. उत्पादन खर्च काढताना सरकार कुठे चुकतेय या संबंधी शरद जोशींनी विपुल लेखन केले आहे. त्याचा आढावा आपण नंतर घेणार आहोत. पण तोवर येवढेच समजून घेऊ की मुळात उत्पादन खर्च काढण्याची पद्धत सदोष असताना तिच्यावर ५०% नफा देण्याची शिफारसही सदोषच आहे. त्यात पुन्हा सरासरी उत्पादन खर्च काढण्याचे कलम शेतकऱ्यांच्या हिताचे नाहीच. आणि म्हणून ज्या शिफारशींच्या जोरावर या आयोगाच्या शिफारशी स्वीकाराव्यात असा आग्रह धरल्या जातोय तो अगदी चुकीचा आहे.

आणि खरेतर ज्या अहवालाचा हेतूच मुळात सरकारची भलामण करणे हा होता त्या कडून शेतकऱ्यांच्या समस्येवर कायमचा उपाय सुचविल्या जाईल ही अपेक्षा करणे चूक नव्हे काय? आणि म्हणून त्याच शिफारशीची अंमलबजावणी करा असा आग्रह धरणाऱ्या संपकरी नेत्यांच्या हेतूविषयी शंका उपस्थित होणे स्वाभाविकच आहे.

**– श्रीकृष्ण उमरीकर**

**परभणी, भ्रमणध्वनी : ९४२२६४६२८३**

*हिंदुस्थानच्या सगळ्या भाषांमध्ये मला शेतकरी नायक म्हणून कुठं दिसत नाही. साहित्यात शेतकरी म्हणजे दुष्ट, जमीन दाराचा पोरगा, खांद्यावर बंदूक टाकून फिरतो, तमासगिरिणीकडे जातो, पोरी पळवतो किंवा विदूषक असतो, सोंगाड्या असतो. माणसासारखा माणूस हाडामांसाचा शेतकरी मला कोणत्याच साहित्यात सापडत नाही .मराठी नाही, हिंदी नाही, गुजराथी नाही, कोणत्याच भाषेत नाही. शोधून काढा ही काय भानगड आहे .....?*

**– युगात्मा शरद जोशी**

**स्वामीनाथन आयोगाचा अहवाल : पान नं. ३**

या पानाच्या सुरुवातीला १९९५-९६ पासून शेतीतील उत्पादन व उत्पादकता कमी झाल्याचे सांगत ती पुन्हा वाढवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागेल असे म्हटले आहे. या पानावर शेतकरी आत्महत्यांचा उल्लेख आहे मात्र देशाला खाऊ घालणाऱ्या स्त्रिया आणी पुरुषांच्या आर्थिक परिस्थिती कडे दुर्लक्ष करून चालणार नाही, केवळ उत्पादनावर भर असता कामा नये असेही म्हटले आहे. या वाक्याने हे तर स्पष्ट आहे की केवळ उत्पादनाकडे लक्ष देणे ही नीती होती किंवा असू शकेल. शेतकऱ्याला निव्वळ मिळकतीच्या कसोटीवर शेतीची प्रगती घासून पाहिली पाहिजे असा दृष्टिकोन वाढीस लावणे या नीतीचे लक्ष आहे. या उद्देशाबरहुकूम आयोगाने काय शिफारशी केल्या याचे विश्लेषण रोचक ठरेल. कारण भारत निर्माण, रोजगार हमी, NHM, या सारख्या भ्रष्टाचाराने अंगभर माखलेल्या योजनांना शेती व शेतकऱ्यांच्या समस्या कायम स्वरुपी सोडवणारे रामबाण उपाय म्हटले आहे. या वरुन ते पुढील पानांवर काय दिवे लावणार आहेत याचा अंदाज आपल्याला अगदी सहज येऊन जातो.

**ललित बहाळे**
**आकोट**

स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी बद्दल नेत्यापासून ते सामान्य नागरिकापर्यंत मोठे गैरसमज आहे. आयोगाच्या शिफारशी अन्न सुरक्षे बाबत आहे. शेतीव्यवसाय सुरक्षेसाठी नाही. आयोगाच्या शिफारशीत प्राधान्याने जमिनीचे समान वाटप करावे, अशीही शिफारस आहे. ही शिफारस आयोग लागू करा म्हणणाऱ्यांना मान्य आहे का?

**मधुसूदन हरणे**
**वर्धा**

स्वामीनाथन आयोग व राम मंदिर हे दोन असे मुद्दे आहेत की जे प्रत्यक्षात येणे कठीण, परंतु निवडणुकीत यांचा वापर करून स्वार्थ साधला जातो. ज्या देशात आतापर्यंत उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळण्याची सोय नाही. तिथे तुम्ही दीडपट भाव मागता. अगोदर उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळवून घ्या. दीडपटचे नंतर बघू. नुसता उत्पादन खर्चावर आधारित भाव जरी मिळाला तरी शेतकरी सुखी होईल. जे शक्य आहे ते मागा उगाच बोलायचा भात बोलायची कढी कशाला?

**हसनराव देशमुख**
**बुलडाणा**

शेतकऱ्यांच्या समस्यांची सोडवणूक करण्याऐवजी ज्यांना राजकीय सत्तांतर घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण करायचा आहे त्यांच्यासाठी स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करा, ही मागणी म्हणजे रामबाण अस्त्र आहे.

**गंगाधर मुटे**
**वर्धा**

# पापक्षालन केलेत आता अन्यायही थांबवा...!



शेतकरी संप ही काही भाजपा किंवा फडणवीस सरकार विरोधातील लढाई नव्हती. कारण सरकार कोणतेही असो तीच कोडगी व्यवस्था देशभरात काम करते. सरकार हा फक्त चेहरा असतो. त्यामुळेच आंदोलनाचे लक्ष्यही सरकार असते. बाकी तत्वत: का होईना, पण सरकारने काही अंशी शेतकऱ्यांना दिलासा दिलाय हे नक्की. आतापर्यंत सरकारने वेळोवेळी शेतमालाच्या आयात-निर्यातीत एकतर्फी हस्तक्षेप करून शेतमालाला स्पर्धाक्षम बाजारभाव मिळू न देण्याकडेच लक्ष दिले. शेतकरी बिचारा कमी आर्थिक गरजांमुळे मग खुरट्या अनुदानावरच समाधान मानून आनंदी जीवन जगत राहिला. पण शेतकरी पुत्रांना असे कुढत जगणे मान्य नव्हते. बाजारात एकतर्फी हस्तक्षेप करणाऱ्यांना ताकद दाखवून हा अन्याय मोडून पाडण्यासाठीच मग त्यानेही पुणतांबेकरांच्या संपात उडी घेतली. भाजीपाला सडवून व दूध घरातच नासवून त्याने मोठ्या जिद्दीने हा संप यशस्वी केला. सरकारवरील दबावही वाढला व कर्जमाफी 'तत्वत:' मान्य झाली. परिणामी आतापर्यंत या व्यवस्थेने केलेल्या अन्यायाचे काही अंशी पापक्षालन झालेय. पण यापुढेही सरकारी हस्तक्षेपातून शेतमालाचे भाव पाडले जाणार नाहीत. भाव पाडून ग्राहक हीत जोपासताना शेतकऱ्यावर अन्याय करणार नाही. असा अन्याय केल्यास सानुग्रह अनुदान दिले जाईल. हमीभावाचे संरक्षण विनाअट दिले जाईल. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीला सरकार किंवा ही व्यवस्था खोडा घालणारच नाही. असे कोणतेही ठोस आश्वासन अजूनही मिळालेले नाही. बाकी सरकारसह सुकाणू समितीचेही अभिनंदन. कारण कोणतेही आंदोलन करून १०० % मागण्या लगोलग मान्य होत नसतात. काही मागण्या मान्य करून घेऊन इतर मागण्यांसाठीचा लढा सुरूच ठेवणे भाग असते. अशा पद्धतीनेच आंदोलन पुढे जाते. नाहीतर मीच श्रेष्ठ व माझ्या 'अभ्यासपूर्ण' मागण्याच सर्वोत्तम, असे धोरण ठेवून आंदोलन केल्यास जनलोकपालांसारखंच आंदोलनाचाही फज्जा उडतो. शेतकरी नेत्यांनी मागण्या मान्य करताना हेच आंदोलनातील व्यवहार चातुर्य दाखविल्याबद्दलही कौतुक वाटते. स्व. शरद जोशी यांनी शिकविलेल्या व्यवहार चातुर्याचाच हा परिणाम असावा.

**सचिन मोहन चोभे**
**शेतकरी संघटना, अहमदनगर**

♦ ♦ ♦

# मिथीलेपासून रावेरीपर्यंत

'रामायण' हजारो वर्षापूर्वी घडलेल्या एका राज घराण्यातल्या घटनांच काव्यमय चित्रण! त्यात काळाच्या ओघात, त्या त्या वेळच्या समाजाच्या मानसिक, बौद्धिक क्षमतेप्रमाणे घडलेले बदल. तरीही आजतागायत त्यातल्या व्यक्तीरेखांचा समाजतल्या सगळ्या स्तरातल्या लोकांच्या मनावर असलेला प्रभाव, ही एक आश्चर्याची आणि अभ्यासाची बाब आहे. रामायणाची सर्व परिचित कथा, त्यातली पात्र, घटना त्यांची तात्कालीक कारण, त्यांचे सामाजिक परिणाम, त्यातही जीवनमूल्य, त्यातले खगोल भूगोलाचे संदर्भ यांचा अनेक दृष्टीकोनातून भरपूर अभ्यास झाला.

पण रावेरीच्या स्वयंसिद्धा सीता मंदिराने आजपर्यंत फारशी विचारात न घेतलेली गोष्ट लक्षात आणून दिली. नव्याने विचार करायला लावणारा प्रश्न उभा केला आणि उत्तरही स्वतःच दिले.

मिथिला नगरीच्या शेतात सापडलेल्या मुलीला स्वतःची मुलगी म्हणून स्वीकारण तिला ''आत्मजा'' म्हणून वाढवण हे बापाच काळीज असलेला जनकच करू शकतो. सीता सुद्धा माझा जन्म जनकापासून नाही मी माझ्या गुणांमुळे त्यांची आत्मजा औरस मुलगी झाले. धुळीत पडलेल्या मला माझी मुलगी म्हणून जनकाने आपल्या ह्रदयाशी धरल आणि अपार स्नेह दिला हे ती अनेकांना कृतज्ञतापूर्वक सांगते. जनकाने सीतेला घडवल आहे. तिच्यातले क्षमागीचे गुण निर्भयता, निर्णयक्षमता, सहनशक्ती, प्रचंड आत्मविश्वास, राजकारणाची समज, बोलण्यातलं चातुर्य, आणि कमालीचा आशावाद हे जनकाने केलेल्या संस्कारांमुळे रुजले आणि वाढले आहेत. म्हणून रामाशी लग्न झाल्यावर अयोध्येतल्या सगळ्यांची ती लाडकी होते. वनवासातही ती आनंदात आहे. रावणाने पळवून नेल्यावर तिच्यातल्या क्षत्रिय गुणांच दर्शन होतं.

''तुझ्या वैभवाचं मला कौतुक नाही आणि मरणाला मी भीत नाही'' असा रावणाला स्पष्ट बजावून तिने रावणाचा पहिला पराभव केला. तिची एकाकी झुंज बघून मारूती आणि बिभीषण थक्क आणि नतमस्तक होतात. पण राम तिच्या चारित्र्यावर संशय घेतो. तेव्हा कमालीची दुःखी आणि संतापलेली सीता अतिशय संभत प्रतिक्रिया देते – ''तुम्ही मला ओळखू शकला नाहीत याच दुःख होते. एखाद्या गावंढळ पुरुषाशी, गावंढळ बाईला बोलाव अस कां बोलता? मातृसत्ताक समाजातला मारुती या प्रकारामुळे अमर्थपूर्ण झाला आहे.

पण अग्निपरीक्षा होते आणि 'शुद्ध' असल्याच प्रमाणपत्र मिळत. पुढे पुन्हा त्याच संशयावरून त्यान तेव्हा मात्र सीतेला आपल्या ''पुरुषोत्तमाच्या'' मर्यादा लक्षात येतात. आता तर ती गर्भवती आहे.

या निष्पाप पतीव्रतेच पालन मलाच केल पाहीजे अस आश्रमवासीयांना स्पष्टपणे सांगून वाल्मिकी सीतेला आश्रय देतात. त्यांच्या आधाराने ती लव, कुश दोन्ही मुलांना घडवते. परित्यक्ता सीतेच्या पाठीशी वाल्मिकी ''बाप'' होऊन उभे राहतात. आपण लिहिलेल्या रामायणाचा काय विषय आहे हे सांगताना वाल्मिकी ''दशानन वध आणि सीतायाः चरितं महत्'' अस सांगतात.

आज रावेरीला लव, कुशाच जन्म स्थळ, वाल्मिकींचा आश्रम आणि तेव्हाची तमसा म्हणजे आजची रामगंगा आहे असा लोकांचा दृढ विश्वास आहे. इतिहासाच 'उत्खनन' करणाऱ्यांना काय करायचं ते करू दे, पण शेकडो वर्षांपूर्वी कुणाला तरी परिव्यक्ता स्त्री च मंदिर बांधाव, तिच्या शापातून थोडस ऋण व्हावस वाटणं हे ही आश्चर्य आणि आदर वाटाव अस आहे.

२००१ पूर्वी उद्ध्वस्त कसे बसे अवशेष सांभाळून उभं असलेलं, गावकऱ्यांच्या दुर्लक्षामुळे पडलेल ते मंदिर मा. शरद जोशींच्या अथक पाठपुराव्यामुळे आणि स्वतःची जमीन विकून दिलेल्या पैशामुळे दिमाखात उभ राहीलं आहे ते आता स्वयंसिद्धा सीता मंदिर आहे.

परित्यक्ता होण्याची वेळच कुणा लेकी बाळीवर येऊ नये म्हणून कौटुंबिक नात्याचं महत्त्व ओळखणाऱ्या शेतकरी संघटनेने परिणामकारक धोरणं आखली आणि राबविली आहेत. महिला आघाडीची शपथ आणि चांदवडची शिदोरी हे त्यांच लिखीत रुप आहे. दुर्दैवाने कुणी परित्यक्ता ठरली. कुटुंबातून बाहेर फेकल्या गेली तर तिला आधार द्यायला, पुन्हा स्वतःच्या पायावर उभ राहण्यासाठी हाताला काम करण्याच कौशल्य आणि बळ द्यायला रावेरीच 'माहेर' तयार आहे. सीतेसारखं कणखर आणि धोरणी व्हायला आत्मसन्मान जपायला, आत्मनिर्भर व्हायला मायबहिणींनी रावेरीला यायला हवं आणि बापाच काळीज घेऊन अशा लेकीबाळींच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहण्याची ताकद आणि हिम्मत मिळवायला शेतकरी भावानींही यायला हवं.

हे मंदिर इतर मंदिरांसारख नाही. येथे भजन, आरत्यांच्या कर्कश कॅसेटस्, चिकट तीर्थप्रसाद, धुरकट अंगारे, आशाळभूत दक्षिणा, फुकट जेवणावळी अशा दांभिक गोष्टींना जागा नाही. येथे सामाजिक बांधीलकी बोलून नाही, तर जगून दाखवायची आहे.

जनक, सीता आणि वाल्मिकी यांच खरं चरित्र जाणून घ्यायचं आहे.

**सौ. प्रज्ञा जयंत बापट**
**महिला आघाडी, यवतमाळ**

♦ ♦ ♦

# स्वयंसिद्धांचा सत्कार

गुरुवार, दि. ४ मे २०१७ रोजी रावेरी येथे स्वयंसिद्धा सीता मंदिराच्या सभागृहात स्वयंसिद्धांच्या सत्काराचा कार्यक्रम शेतकरी संघटना आणि महिला आघाडीतर्फे घेण्यात आला. अध्यक्षस्थानी अॅड. वामनराव चटप (माजी आमदार) होते. सौ. सरोजताई काशीकर, सौ. गीता खांदेभराड, सतीश दाणी, सीमा नरोडे, मदन कामडी, चंद्रकांत देशमुख, पांडुरंग भाळशंकर यांच्या उपस्थितीत पाच स्वयंसिद्धांचा - ज्यांनी प्रतिकूल परिस्थितीत एकटीने आपल्या मुलांना शिक्षण दिले घडवले - शाल, साडी, फुले आणि श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. स्वयंसिद्धांपैकी स्मिता नरोडे यांना बोलताना अश्रू आवरत नव्हते हे कृतज्ञतेचे अश्रू आहेत असे त्या म्हणाल्या.

सीताशेती - माजघरशेती म्हणजे शेतमालाची आणि प्रक्रिया केलेल्या शेतमालाच्या पदार्थांची विक्री करण्याचा यशस्वी उद्योग करणाऱ्या उद्योगिनींनी आपले अनुभव सांगीतले. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी समयोचित मार्गदर्शन केले.

**स्वयंसिद्धा - स्मिता नरोडे**
**विमल चहारे**
**कलावती बोमलकर**
**शोभा सिडाम**

♦ ♦ ♦

### शेतमालाचे हमीभाव सन २०१५-१६

| पीक | राज्याची शिफारस (रु./प्रति क्विंटल) | केंद्राची हमी किंमत |
|---|---|---|
| भात | २९५४ | १४१० |
| ज्वारी | २५०९ | १५१० |
| बाजरी | ३०८८ | १२७५ |
| तूर | ४७२१ | ४६२५ |
| मूग | ८२३१ | ४८५० |
| उडीद | ६७१२ | ४६२५ |
| सूर्यफूल | ५३८३ | ३८०० |
| तीळ | ९९१५ | ४७०० |
| कापूस | ६८९४ | ४१०० |
| करडई | ५०६३ | ३०५० |

*माणसाचे विचार करण्याचे इंद्रिय हे मेंदू नसून खिसा आहे.*
**- युगात्मा शरद जोशी**

# केवळ शेतकरी नव्हे, तर शेती कर्जमुक्त होणे गरजेचे आहे



शेती नियंत्रणमुक्त आणि संरचनायुक्त असेल तरच ती फायद्याची होऊ शकते. हे वास्तव एकदा सिद्ध झाल्यानंतर मोठी शेती, लहान शेती, बागायती शेती हे सर्व शेती प्रकार भारतीय परिस्थितीमध्ये नुकसानदायीच असतात. नुकसानीचे प्रमाण फक्त कमी अधिक असू शकते. पण सर्वसाधारण चर्चेत मात्र अशा भेदा-भेदांची (समाजवादी) परंपरा अद्याप टिकून आहे. कर्जमुक्तीसारख्या विषयात हे प्रकर्षाने दिसून येते. शेती व्यतिरिक्त वेगळे उत्पन्नाचे साधन असणाऱ्यांना कर्जमुक्ती/कर्जमाफी मिळू नये हा देखील असाच समाजवादी पठडीतला आणखी एक वेगळा विचार आहे. निखळ शेती उत्पन्नातून कर्जाची परतफेड होणे कदापि शक्य नाही. परंतु एका फायद्याच्या धंद्यातून वा नोकरी पेश्यातून (सरकारी धोरणांमुळे नुकसानीत असणाऱ्या शेतीसारख्या) दुसऱ्या व्यवसायाचा तोटा भरून घेण्याची कल्पना अन्यायकारक, अव्यवहार्य, बेकायदेशीर आणि धोक्याची आहे. शेतकऱ्यांच्या उद्यमशीलतेवर निर्बंध लादण्याचाच हा आणखी एक प्रकार आहे.

आपल्या प्रयत्नांचा, आंदोलनाचा मुख्य हेतू आणि उद्देश 'शेती एक व्यवसाय म्हणून फायद्याचा उपक्रम' ठरावा हा आहे. शेती करू इच्छिणाऱ्यांसाठी क्षेत्राकडे नव-नवीन गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी आणि त्याच बरोबर शेतीतून बाहेर पाडणाऱ्यांसाठी लाभदायक ठरावे या करिता अनेक धोरणात्मक बदल व्हावे लागतील. पण सर्वा आधी शेती कर्जमुक्त व्हावी लागेल.

आयकर चुकविण्यासाठी आणि भ्रष्ट मार्गाने मिळवलेले उत्पन्न लपविण्यासाठी शेतीचा सहारा घेणारे काही लोक आहेत. त्यांच्या विरोधात असलेल्या भावनेतून ही मानसिकता तयार झाली आहे हे समजू शकते. पण अशी प्रकरणे शोधून काढण्या ऐवजी सरसकट सगळ्यांना एकाच तराजूत तोलणे असंयुक्तीक ठरते. यावर शेती निर्बंधमुक्त करून शेती उत्पन्न आयकर युक्त करणे हाच सरळ आणि संयुक्तिक उपाय आहे हे (तटस्थपणे) समजून घेणे आवश्यक आहे.

**- गोविंद जोशी**
**परभणी**

♦ ♦ ♦

# कपाशीवरील रस शोषण करणाऱ्या किडींची ओळख आणि एकात्मिक व्यवस्थापन

**रस शोषण करणाऱ्या किडी :**

- तुडतुडे
- फुलकिडे
- पांढरी माशी
- मावा
- पिठ्या ढेकूण

**तुडतुडे :**

प्रौढ तुडतुडे साधारणपणे २ ते ४ मि.मी. लांब, पाचरीच्या आकाराचे व फिकट हिरव्या रंगाचे असतात. त्यांच्या समोरच्या पंखावर प्रत्येकी एक काळा ठिपका असतो आणि डोक्याच्या भागावर दोन काळे ठिपके असतात. यांची पिल्ले सुद्धा फिकट हिरव्या रंगाचे असून यांना पंख नसतात. तुडतुड्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे ते नेहमी तिरके चालतात व चटकन उडी मारतात.

तुडतुड्याची प्रौढ व पिल्ले पानाच्या मागील बाजूने राहून रस शोषण करतात. त्यामुळे सुरुवातीला पानाच्या कडा पिवळसर पडतात, पाने आकसतात व नंतर कडा तपकिरी किंवा लालसर होतात. प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास झाडाची संपूर्ण पाने तपकिरी होतात.

**फुलकिडे :**

ही कीड अतिशय लहान व नाजूक असून ते १ मि.मी. पेक्षा कमी लांब असून रंगाने फिकट पिवळसर असतात. सूक्ष्मदर्शक यंत्रातून त्यांची तपासणी केली तर त्यांच्या पंखांच्या कडा केसाळ दिसतात. यांची पिल्ले सुक्ष्म व बिनपंखी असतात.

प्रौढ फुलकिडे आणि पिल्ले कपाशीच्या पानामागील भाग खरवडून त्यातून निघणारा रस शोषण करतात. प्रादुर्भावग्रस्त भागातील पेशी शुष्क होतात. तो भाग प्रथम पांढुरका आणि नंतर तपकिरी होतो. त्यामुळे पाने व कळ्या आकसतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास पाने कडक होऊन फाटतात.

**पांढरी माशी :**

प्रौढ माशी लहान असून साधारणपणे २ ते ३ मि.मी. असते. पंख पांढरे किंवा करड्या रंगाचे असून शरीरावर पिवळसर झाक असते. डोक्यावर मध्यभागी दोन तांबडे ठिपके असतात.

पांढऱ्या माशीचे प्रौढ व पिल्ले पानाच्या खालच्या बाजूने राहून रस शोषण करतात. अशी पाने कोमेजतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास पाने लालसर ढिसूळ होऊन शेवटी वाळतात. याशिवाय पिल्ले त्यांच्या शरिरातून गोड चिकट द्रव बाहेर टाकतात. त्यामुळे संपूर्ण झाड चिकट व त्यावर बुरशी वाढून काळसर होते. त्याबरोबर काही विषाणूचा प्रसारसुद्धा या माशीमुळे होतो.

**मावा :**

पूर्ण वाढ झालेला मावा लांबट असून रंगाने पिवळसर ते गडद हिरवा किंवा काळा व १ ते २ मि.मी. लांब असतो. मावा शरीराने मृदू असून पोटाच्या मागच्या बाजूस शिंगासारखी दोन टोके असतात. ही कीड बहुतेक करून बिनपंखी अवस्थेत आढळतो, परंतु पंख असलेला मावा सुद्धा आढळून येतो.

माव्याची प्रौढ व पिल्ले पानाच्या खालच्या बाजूने आणि कोवळ्या शेंड्यावर समूहाने राहून त्यातील रस शोषण करतात. अशी पाने आकसतात व मुरगळतात. त्यामुळे झाडाची वाढ खुंटते. मावा या किडीचा प्रादुर्भाव पिकाच्या रोपवस्थेत आणि शेवटच्या अवस्थेत आढळतो.

**पिठ्या ढेकूण :**

या किडीचा आकार ४ ते ५ मि.मी. असून त्याचा रंग पांढरट ते पिवळसर असतो. या किडीची पिल्ले आणि प्रौढ ढेकूण लहान, चपटी व दीर्घ वर्तुळाकार असतात. शरीराभोवतीचे मेणासारखे पांढऱ्या रेशमी कापसासारखे आवरण हळूच बाजूला केले तर पिवळसर रंगाचे ढेकूण दिसतात.

पिठ्या ढेकणाची प्रौढ व पिल्ले कपाशीचे पाने, कोवळी शेंडे, पाते, फुले व बोंडे यातून रस शोषण करतात. त्यामुळे त्यांची वाढ होत नाही. हे ढेकूण त्यांच्या शरिरातून चिकट द्राव बाहेर टाकतात. कालांतराने त्यावर बुरशीची वाढ होते व त्याचा झाडावर विपरित परिणाम होतो. बोंडे फुटल्यानंतर रुईवर बुरशी वाढून प्रत खालावते.

**एकात्मिक कीड व्यवस्थापन :**

**मशागतीय पद्धती :**

- कपाशीची धसकटे, पालापाचोळा जमा करून कंपोस्ट खड्ड्यात टाकावा.
- कपाशीच्या शेताच्या कडेने पाण्याच्या चारीतील तसेच पडीक जमिनीतील किडींच्या पर्यायी यजमान वनस्पतीचा नायनाट करावा.
- कपाशीचा खोडवा घेण्याचे टाळावे.
- कपाशीच्या कुळातील (भेंडी, अंबाडी) किंवा ज्या पिकावर कपाशीवरील किडी उपजिवीका करतात (टोमॅटो, हरभरा इ.) अशी पिके कपाशी पूर्वी किंवा नंतर घेऊ नयेत.
- रस शोषण करणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव वाढू नये, म्हणून जास्तीच्या नत्र खताचा वापर टाळावा.
- शिफारशीनुसार दोन ओळीतील व दोन झाडातील अंतर ठेवावे.
- कपाशीवरील किडींच्या नैसर्गिक शत्रू किटकांचे संवर्धन होण्यासाठी मका, चवळी, उडीद, मूग यासारखी आंतरपीके/ मिश्रपिके तसेच कपाशी पिकाभोवती झेंडू आणि एरंडी या सापळा पिकांची एक ओळ कडेने लावावी.
- आंतरमशागत करून पीक ८-९ आठवडे तणविरहीत ठेवावे.

तसेच ज्या तणावर पिठ्या ढेकणावर जगणारे परोपजीवी कीटक (प्रोम्युसिडी, ॲनासियस, ॲनागायरस) आढळून येतील अशी तणे काढू नयेत.

**यांत्रित पद्धती :**

- पिठ्या ढेकणाचे व्यवस्थापन करताना फक्त प्रादुर्भावग्रस्त पिकावर फवारणी करावी अथवा प्रादुर्भावग्रस्त भाग किडीसहीत काढून नष्ट करावा.
- पिवळ्या रंगाला पांढऱ्या माश्या आकर्षित होऊन चिकटतात व मरतात म्हणून पिवळे चिकट सापळे कपाशीचे शेतामध्ये लावावेत.

**जैविक पद्धती :**

- ढालकिडा (लेडी बर्ड बीटल) : या किटकाचे प्रौढ भुंगे व त्यांच्या अळ्या प्रामुख्याने मावा किडीवर जगतात, म्हणून पिकावर मावा किडीसोबत लेडी बर्ड बीटल पुरेश्या प्रमाणात आढळून आल्यास रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळावा.
- क्रायसोपा : क्रायसोपाची हेक्टरी १०,००० अंडी या प्रमाणात कपाशीचे शेतात एक सारख्या प्रमाणात, पीक ४० ते ४५ दिवसाचे झाल्यानंतर ३० दिवसाच्या अंतराने दोन वेळा सोडावीत, हे मित्र कीटक मावा, तुडतुडे यावर जगतात.
- कपाशीवरील किडींचे नैसर्गिक शत्रू कीटक (शेतकऱ्यांचे मित्र कीटक) उदा. सीरफीड माशी, पॅन्टाटोमीड ढेकूण, कातीन, भुंगे, ड्रॅगनफ्लाय (चतूर), रॉबरमाशी, गांधीलमाशी, प्रार्थनाकीटक (मॅन्टीड), टॅकनिड माशी ई. चे संवर्धन करावे.
- वनस्पतीजन्य आणि जैविक किटकनाशकाचा वापर : ५ टक्के निंबोळी अर्काची अथवा ॲझाडिरेक्टीन १०००० पीपीएम १ मि.ली. प्रती लीटर किंवा १५०० पीपीएम २.५ मि.ली. प्रती लीटर फवारणी करावी.
- पिठ्या ढेकणासाठी व्हर्टिसिलीयम लिकॅनी या बुरशीची ४ ग्रॅम प्रती लीटर पाण्यामध्ये मिसळून फवारणी करावी.

**कपाशीवरील किडींच्या व्यवस्थापनासाठी वापरावयाचे कीटकनाशके**

| किडी | किटकनाशके | मात्रा/१० ली.पाणी |
|---|---|---|
| तुडतुडे<br>फुलकिडे<br>मावा | फ्लोनीकॅमीड ५० डब्ल्युजी किंवा | २ ग्रॅम |
| | बुप्रोफेझीन २५ एससी किंवा | २० मिली |
| | डायफेन्थुरॉन ५० डब्ल्युपी किंवा | १२ ग्रॅम |
| | फिप्रोनील ५ एससी किंवा | ३० मिली |
| | ॲसिफेट ७५ एसपी किंवा | ८ ग्रॅम |
| पांढरी माशी | निंबोळी तेल ५ टक्के किंवा | ५० मिली |
| | डायफेन्थुरॉन ५० डब्ल्युपी किंवा | १२ ग्रॅम |
| | बुप्रोफेझीन २५ एससी किंवा | २० मिली |
| | ॲसिफेट ७५ एसपी किंवा | २० ग्रॅम |
| | फ्लोनीकॅमीड ५० डब्ल्युजी किंवा | २ ग्रॅम |
| | पायरीप्रोक्झीमेन १० ईसी किंवा | १० मिली |
| | स्पायरोमेसिफेन २२.९ एससी | १२ मिली |

- वरील किटकनाशकाची मात्रा साध्या पंपासाठी आहे. पेट्रोल पंपासाठी मात्रा तीनपट करावी.



- शेतात किटकनाशकांचा वापर करतांना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा.

**काय करू नये ?**

- पिकाच्या पहिल्या दोन महिन्याच्या काळात रासायनिक किटकनाशकांची फवारणी टाळावी.
- दुय्यम किडीसाठी फवारणी करू नये.
- निओनिकोटीनॉईड गटातील किटकनाशकांचा वापर टाळावा.
- जागतिक आरोग्य संघटना वर्ग १ मधील कीटकनाशके जसे फॉस्फॅमीडॉन, मिथाईल पॅराथिऑन, मोनोक्रोटोफॉस तसेच निओनिकोडीनॉईड गटातील कीटकनाशके जसे इमीडाक्लोप्रीड, असिटामिप्रीड, थायामिथोक्झाम, क्लोथीनियाडीन इत्यादीचा वापर करू नये.
- किटकनाशकांची मिश्रणे करून फवारणी करू नये.
- जास्तीच्या नत्र खताचा वापर टाळावा.


**श्री. व्ही.व्ही. खोबे**
**प्रा. बी.व्ही. भेदे**
**कु. आरती भोसले**
कृषी किटकशास्त्र विभाग
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ,
परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)
**प्रा. बी.व्ही. भेदे,** मो. ७५८८०८२०२८


## भारतात व इतर देशात शेतीला मिळणारे अनुदान

| देश | अनुदान (%) | कृषी अवलंबित जनसंख्या (%) |
|---|---|---|
| युरोप | ३७ | ८ |
| अमेरिका | २६ | ५ |
| जपान | ७२ | ४ |
| चीन | ३४ | २४ |
| द. आफ्रिका | ६१ | १८ |
| भारत | ९.३ | ६० |

# कुर्णोली येथे शेतकरी युवा आघाडी शाखा फलकाचे अनावरण व प्रवेश सोहळा संपन्न




दि.२१/०३/२०१७ रोजी कुर्णोली ता.दिंडोरी येथे शेतकरी युवा आघाडी शाखा सुरू करण्यात आली. तसेच कुर्णोली गावातील ५०च्या वर तरुण शेतकरी मित्रांनी शेतकरी संघटनेचा बिल्ला छातीवर लावून शेतकरी अन्याया विरोधी लढा उभारण्याची शपथ घेतली. जो पर्यंत सरकार शेतकऱ्याची संपूर्ण सरसकट कर्जमुक्ती करत नाही तो पर्यंत कोणीही कर्ज व लाइट बील भरणार नाही असा निर्धार केला. कर-कर्जा नही देंगे। बिजली का बिल भी नही देंगे. पिकलं तव्हा लुटलं-देणं घेणं फिटलं. युगात्मा शरद जोशी झिंदाबाद.

भीक नको हवे घामाचे दाम अश्या विविध घोषणा देऊन परिसर दणाणून सोडला. आपल्या प्रास्ताविक भाषणात जिल्हाध्यक्ष श्री. अर्जुन तात्या बोराडे यांनी द्राक्ष विक्रीबाबत परराज्यातून येणाऱ्या व्यापारी वर्गाचे पोलीस व्हेरीफीकेशन व्हावे व बाजार समिती मार्फत व्यापाऱ्यांना ओळखपत्र द्यावे, असा प्रश्न उपस्थित केला जेणेकरून वेळोवेळी शेतकरी वर्गाची फसवणूक थांबेल.

तसेच महाराष्ट्र राज्य अध्यक्ष शेतकरी युवा आघाडी श्री. सतीशभाऊ दाणी यांनी तरुणांनी आपल्या बापावर होणाऱ्या अन्यायाचा बदला घेण्यासाठी पेटून उठले पाहिजे व कुठलाही वसुली अधिकारी गावात येऊ देऊ नका, असे आवाहनं केले. श्री. शंकरपुरकर, श्री. रामकीसन बोंबले ह्या मान्यवरांची भाषणे झाली.

पुणे येथून आलेल्या प. महाराष्ट्र महिला आघाडी अध्यक्षा श्रीमती सीमाताई नरोडे यांनी शेतकरी महिलांचे विविध प्रश्न यावेळी मांडले. यावेळी शेतकरी युवा आघाडी तालुका प्रमुख म्हणून श्री. संजय शिवाजी नाठे, शाखा प्रमुख म्हणून कुमार प्रवीण केशव झोमन यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्र संचलन कवी श्री. संतोष झोमन यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. सोपान संधान, शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष, श्री.संदीप संधान जिल्हाध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी, नितीन नाठे, दिगंबर नाठे, राजेंद्र नाठे, शिवाजी नाठे, राहुल झोमन, शंकर झोमन, रवींद्र झोमन, राजेंद्र झोमन, सागर संधान, सुमित संधान, शिवंम संधान, मयूर संधान, गोकूळ संधान, अक्षय संधान, रवींद्र नाठे, वाल्मिक नाठे, प्रवीण फुगट, शरद झोमन, शिवाजी मालसाने, शरद राजगुरू, राहुल संधान इतर असंख्य तरुण कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

♦ ♦ ♦

*एकेक दिवस बी पेरल्यावर हाती पीक येईपर्यंत किंवा न येईपर्यंत सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतकऱ्यांच्या मनाला ज्या इंगळ्या डसतात त्याचं चित्रण साहित्यात मला कुठंच दिसत नाही. साहित्यात नाही आणि सिनेमातही नाही... मराठीतले जे ग्रामीण साहित्य आहे, ते खेड्यांशी संबंधित आहे अस खरंच मला वाटत नाही. तुम्ही समेलन घालाल, डेरे घालाल, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, ..अशी समेलन घालाल, त्यांचे मंच उभे कराल, निधी जमवाल पण तुम्हाला असं वाटतं असलं की यातून मराठी भाषा जगणार आहे तर तो तुमचा भ्रम आहे. याने मराठी भाषा जगणार नाही. मराठी भाषा मोठी करायची असेल तर मराठी माणूस मोठा झाला पाहिजे. लहान माणसांची भाषा मोठी असूच शकत नाही एवढंच मला सांगायचं आहे.*

**– युगात्मा शरद जोशी**

# शरद जोशी भारत उत्थान कार्यक्रमानुसार चर्चेसाठी शेतकरी संघटनेचे किमान मुद्दे

**१. खुलीकरण :** केंद्र सरकारने सर्व शेतमाल व पशुधन बाजार, आयात-निर्यात, प्रक्रिया व वायदेबाजार पूर्णपणे कायमचा खुला केल्याची, भावपाडू आयात व अन्याय्य निर्यातबंदी थांबवण्याची, तसेच जनुकबदल बियाणासहित शेती-तंत्रज्ञान वापरावरचे सर्व निर्बंध उठविल्याची कालमर्यादेत आत घोषणा करावी व राज्याने याची राज्यापुरती त्वरित अंमलबजावणी करावी.

**२. आवश्यक वस्तू व सेवा कायदा (ESMA) मधून शेतमाल वगळणे :** आवश्यक वस्तू व सेवा कायदा (ESMA) वापरून सरकारे शेतमाल-बाजार पाडण्याचा शेतकरी-विरोधी कार्यक्रम अनेक दशके करीत आहे. यास्तव या कायद्यातून शेतमाल कायमचा मुक्त करीत असल्याची लेखी ग्वाही द्यावी.

**३. संपूर्ण कर्ज व वीजबील मुक्ती :** कर्जाबाबत लहानमोठा शेतकरी असा भेद न करता संपूर्ण कर्जमुक्ती, अथवा १० वर्षे मुद्दल-वसुली स्थगिती व सर्व व्याज सरकार भरेल, थकीत वीजबील-मुक्तीचा असा निर्णय घेतल्याची घोषणा करावी.

**४. नुकसान-भरपाई :** तूर, सोयाबीन यांचे आधारभूत किमती जाहीर करूनदेखील सरकारने निर्यात थांबवून व विशेष आयात करून भाव पडलेले आहेत व कांदा-बटाटा आयात-निर्यातीत प्रतिकूल हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचे केलेले नुकसान भरून काढण्यासाठी हिशेब-शहानिशा करून रक्कम एक महिन्याच्या आत खात्यांवर जमा करावी.

**५. साखर-उद्योग निर्बंधमुक्ती :** साखर-उद्योग निर्बंधमुक्त करावा, साखर कारखान्यांना व्हाऊचर लेखा-परीक्षणाऐवजी कॉस्ट-लेखा-परीक्षण लागू करावे आणि साखरेसाठी गुजराथ-गणदेवी कारखाना प्रारुपानुसार २०१७ पासून भाव देणे बंधनकारक करावेत.

**६. दुधाच्या दराबद्दल :** गायीचे व म्हशीचे दूध अनुक्रमे ४० व ५० रु प्रतिलीटर दर मिळावेत.

**७. जमीन-संपादन :** शरद जोशी भारत-उत्थान कार्यक्रमानुसार शेतीसाठी तसेच शेतमाल प्रक्रिया व पणन-संबंधी संरचना (सिंचन, रस्ते, वीज, साठवणूक) विकसित करण्यासाठी सरकारने भू-संपादन करताना जमीनधारकांचे योग्य भाव, आवश्यक तर नियमित स्वामित्व-शुल्क देऊन व समाधान करूनच जमीन-अधिग्रहित करावी. खाजगी प्रकल्पासाठी स्वत: सरकारने भूसंपादन अजिबात करू नये.

**८. वीज पुरवठा :** शेतीसाठी पूर्ण दाबाने नियमित वीजपुरवठा करावा.

**९. कमाल जमीनधारणा कायदा रद्द करणे :** शेतजमीन-कमाल जमीनधारणा कायदा ताबडतोब रद्द करावा.

**श्री रामचंद्रबापू पाटील (सदस्य-शेतकरी संघटना न्यास)**
**श्री अनिल घनवट (अध्यक्ष, शेतकरी संघटना)**

# आयुष्य मातीमध्ये मस्ती करण्यात गेले असते!



मी १९८४ साली आंबेठाण येथे शेतकरी संघटनेच्या प्रशिक्षण शिबिराला गेलो होतो. त्या शिबिरात मी शरद जोशींकडून शेतीची लूट व ती लूट थांबविण्यासाठीचे उपाय या बद्दल व अर्थशास्त्राबद्दल जे शिकलो ते शिक्षण जगातल्या कुठल्याही विद्यापीठात कितीही पैसे खर्च केले असते तरी मिळू शकले नसते. शेतकरी संघटनेचा अशिक्षित समजला जाणारा धोतर्याय शेतकरी कार्यकर्ता सुद्धा स्वत:ला अर्थशास्त्री वगैरे समजणाऱ्या चांगल्या-चांगल्याची बोलती बंद करून टाकतो. त्या प्रशिक्षण शिबिरात आम्हाला शेतकरी संघटनेचे काम करत असताना पत्रकार व स्वत:ला विद्वान वगैरे समजणारे लोक काय काय प्रश्न विचारतील ह्याची १ यादी तयार करून दिली होती व त्याला काय उत्तर द्यायचे ते शिकविले होते.

मी १९८२ सालापासून शेतकरी संघटनेचे काम करतो आहे. मला अनेक पत्रकार व महाभाग भेटले मी अनेक पत्रकार परिषदा घेतल्या व बघितल्या पण आजपर्यंत एकाही पत्रकाराने किंवा महाभागाने मला १९८४ साली शरद जोशींनी करून दिलेल्या प्रश्नाच्या यादीच्या बाहेरचा प्रश्न विचारला नाही.

आजच्या तरुण पिढीला शरद जोशींच्या विचारांची ओळख करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांना फालतू कथा कादंबऱ्या वाचून स्वतःचा शक्तिपात करून घेण्यापेक्षा स्वतःच्या जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर शरद जोशींची संपूर्ण ग्रंथसंपदा वाचणे जरुरीचे आहे. माझ्या घरात कित्येक हजार पिढ्यांमध्ये कोणीही ४ थी किंवा ५ वी च्या वर शिकले नव्हते. आमच्या कडे भरपूर शेती असल्यामुळे मी चांगला अभ्यास करावा व खूपं शिकावे अशी कोणाचीही इच्छा नव्हती. माझे प्राथमिक शिक्षण आमच्या गावच्या झेड.पी.च्या शाळेत व नंतरचे माध्यमिक शिक्षण मराठी medium मध्ये झाले आहे. मला चांगले इंग्रजी बोलता येते हे सुद्धा शरद जोशींकडून समजले, म्हणून मी हायकोर्टात वकिली करायची हिंमत केली. शरद जोशींच्या संपर्कात आल्यामुळेच माझा आत्मविश्वास वाढला, लाचारीचे जिणे सोडून देण्याची सद्बुद्धी झाली, माझा स्वाभिमान जागृत झाला व माझे आयुष्य बदलून गेले व माझ्या भविष्यकालीन पिढ्यांचा उद्धार झाला. नाहीतर माझे आयुष्यही मातीमध्ये मस्ती करण्यात गेले असते.

**ॲड. प्रकाश पाटील**
**औरंगाबाद**

♦ ♦ ♦

# शेतकरी प्रश्नावर ग्रामीण भागातून स्थलांतरित शेतकरी मुलांनो जागे व्हा!

महाराष्ट्र शासनाच्या विविध खात्यातील कर्मचारी संघटनांनी सातवा वेतन आयोग लागू करावा म्हणून संपाचा इशारा देऊन सरकारची डोकेदुखी वाढवली आहे. शेतकरी संप चालू असताना कर्मचारी वर्ग शेतकऱ्यांशी कसा वागतो. तलाठी, ग्रामसेवक, कृषी, यांची एकूणच ग्रामीण भागातील जनतेला लुटण्याचीच भूमिका असते. यावर भाषणातून तरुण शेतकऱ्यांनी गावोगावच्या सभांमधून भावना व्यक्त केल्या तर महाराष्ट्र शासनाने कर्जमुक्तीसाठी लावलेल्या निकषांची तुलना कर्मचारी वर्गाशी केली.
एकाच घरातील दोन तीन लोक सर्व्हिसला असतील तर एक पगार घेतील का? एकाच घरात राहत असताना प्रत्येकाला घर भाडे मिळते कसे? हा विषय वरवर विनोदाचा वाटत असला तरी वेगळे वळण घेऊ शकतो हे नाकारता येणार नाही, हे कर्मचारी वर्गाने वेगळीच लक्षात घेऊन योग्य काम केलेलं बरं!

परंतु जो काम करील त्याला मोबदला मिळाला पाहिजे. परंतु एकाच घरात जितके जण राहतात त्यापैकी सर्व मिळून एकालाच घरभाडे मिळाले पाहिजे. त्यांना सर्वांचे उत्पन्न एकत्र करून income tax भरला तरी मोठी रक्कम उभी राहू शकते आणि या पैशातून शेतकरी कर्जमुक्त होऊ शकतो? आणि हो आपला पगार हा लोकांच्या करातून मिळतो याची जाण नोकरदारांना पाहिजे.

आपण नोकरी करतो म्हणजे समाजावर उपकार करतो ही भावना सोडून समाजाच आपण देणं लागतो ही भावना रुजणं गरजेच आहे. शेतकऱ्यांना तर गल्ली पासून दिल्ली पर्यंत लुटणारेच भेटतात. अतिवृष्टी, पडलेल्या शेतीमालाचे अनुदान, बाप मेल्यावर वारसनोंद, विधवांना पेन्शनं, वृद्धांना दाखले, पिकपेरा अशा सर्व कामाची लाच घेणारे जवळजवळ ८०% लाचखोर कर्मचारी असतील आणि जे पंधरा वीस टक्के चांगले अधिकारी कर्मचारी आहेत म्हणून हा देश विकायचा राहून गेला असेल!

यातील बरीच मंडळी आपल्याच शेतीतून, मातीतून गेली. आईवडीलांनी काय खस्ता खाऊन यांना तिथपर्यंत पाठवलं हे महाशय शहरी संस्कृतीत इतके रममाण झाले की शेतकरी आणि ग्रामीण माणसाशी संबंधसुद्धा ठेवायला त्यांना लाज वाटते.

बंगला, गाडी, मुलांच्या इंग्रजी माध्यमातील शिक्षण यामुळे अधिक पैसा कमाविण्याचा नादात गडी अख्खा गावशिव विसरून गेला. बाप मेला की भावाने फाशी घेतली याचा त्याला विसर पडला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आजच्या परिस्थितीला हा वर्ग मोठ्या प्रमाणात जबाबदार आहे अस माझं मत आहे.

जेव्हा काही शेतकऱ्यांना देण्याची वेळ येते तेव्हा विरोध करणाऱ्यामध्ये ही आपल्यातून निघून गेलेली मंडळी अग्रेसर असते. किंबहुना शहरी हित जपण्यासाठी लोकप्रतिनिधी निवडून देतात म्हणून शेतकरी हिताचे निर्णय होत नाही आणि मग गाजर दाखवून ग्रामीण भागात कशी आणि किती फुटपाडायची या मध्ये राजकारणी हुशारच हे सांगणे न लगे. जो पर्यंत ५६ टक्के लोक एकत्र येऊन आपला हिस्सा मागत नाही, तो पर्यंत हे असच चालायचे, परंतु शेतकऱ्यांच्या पोरांमध्ये जागृती होत असून ते आता लढायला सिद्ध होताना दिसत आहे. हेच शेतकरीपुत्र एकदिवस राजकारणी व अधिकारी यांची झोप उडविणार हे मात्र नक्की.

शेतकरी हिताविरुद्ध नियम /पॉलिसी /योजना आखणाऱ्यांनो सावधान!

**– बापुसाहेब पगारे**
**नासिक**

---


## १९७३ पासून २०१७ पर्यंत विविध वस्तुंमध्ये झालेली वाढ

| वस्तु | १९७३ | २०१७ | वाढ पटीत |
|---|---|---|---|
| कापूस | ५०० | ४१६० | ८ |
| ज्वारी | २०० | १५०० | ८ |
| गहू | ४०० | १८०० | ५ |
| तुर | ९०० | ५०५० | ५.५ |
| सोयाबीन | – | २८०० | – |
| पेट्रोल | ३ | ७० | २४ |
| डिजेल | २ | ५७ | २८ |
| सोने | ४०० | २९,५०० | ७५ |
| शिपाई | १७५ | २१,००० | १२० |
| क. लिपीक | २२५ | २५,००० | ११२ |
| प्राध्यापक | ६०० | १,५०,००० | २५० |
| प्राचार्य | ८०० | २,००,००० | २५० |

**शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात १२० पट ते २५० पट वाढ तर शेतमालाच्या भावात फक्त ५ पट ते ८ पट वाढ**

जीव पेरला मातीमध्ये **पत्थर** छातीवरती...
**प्रश्न** टांगले आभाळाला उत्तर मातीवरती....?
– नितिन देशमुख

# मराठी साहित्याची श्रीमंती वाढविणारा मौलिक ग्रंथ : अंगारवाटा




शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांचे वडील पोस्टात नोकरीला होते. ते साताऱ्यात कार्यरत असताना शरद जोशींचा जन्म झाला. शरद जोशी कोल्हापूरला प्राध्यापक म्हणून नोकरी करीत होते. ते संस्कृतप्रेमी होते. एका मित्राने तू संस्कृत भाषेचे उच्च शिक्षण घेणार असशील असं म्हटल्यानं जोशी चिडले आणि कॉमर्सला गेले. मुंबईच्या ज्या सिडनम कॉलेजमधून आजचे जगातले सर्वात महत्त्वाचे अर्थशास्त्रज्ञ जगदीश भगवती आणि इतर अनेकजण शिकले तिथे जोशींनी उच्च शिक्षण घेतले.

मुळात उच्च दर्जाचा अर्थशास्त्रज्ञ असलेला हा माणूस आय.ए.एस. परीक्षा पास झाला. आज ज्याला यु.पी.एस.सी.ची परीक्षा म्हणतात तिला त्या काळात आय.ए.एस.ची परीक्षा म्हणत असत. त्या परीक्षेत पास होऊनही थोडे कमी गुण मिळाल्यानं त्यांना आय.ए.एस. केडर न मिळता इंडियन पोस्टल सर्व्हिसचे केडर मिळाले. आयुष्यभर नोकरी करून निवृत्त होताना त्यांचे वडील ज्या पदावर होते तिथून शरद जोशींनी सेवेची सुरुवात केली.

या खात्यात उच्चपदी जाण्याची संधी असतानाही त्यांनी ही नोकरी सोडली आणि ते स्वित्झर्लंडला गेले. तिथे जागतिक टपाल सेवेत आठ वर्षे त्यांनी नोकरी केली. खूप सुखाची आणि भरपूर पगाराची असलेली ही नोकरी सोडून आपल्या पत्नीच्या व मुलींच्या इच्छेविरुद्ध ते भारतात परत आले आणि शेती करू लागले. शेती तोट्यात का जाते या प्रश्नाचा पिच्छा पुरवताना त्यांनी शेतकरी चळवळ उभारली.

स्वातंत्र्य चळवळीनंतरची सर्वाधिक लोक तुरुंगात गेल्याचा विक्रम करणारी ही चळवळ त्यांनी नावारूपाला आणली. देशातला शेतीप्रश्न त्यांनीच ऐरणीवर आणला. त्यांनी शेतकऱ्यांना आत्मसन्मान दिला. स्वाभिमान दिला. 'भीक नको, हवे घामाचे दाम' ही घोषणा त्यांनीच जन्माला घातली. इंडिया विरुद्ध भारत अशी ठळक मांडणी करून सदैव लाथाडल्या गेलेल्या शेतकऱ्याची वेदना इंडियाच्या वेशीवर टांगली. लक्ष्मीमुक्तीच्या आंदोलनातून दोन लाख महिलांची नावं सात बाराच्या उताऱ्यावर लावली गेली. भारतातल्या बहुतेक प्रश्नांचे मूळ दारिद्र्यात आहे आणि या दारिद्र्याचे मूळ शेतकऱ्याच्या शोषणात आहे, शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित वाजवी दाम मिळाल्याशिवाय हे दारिद्र्य दूर होणार नाही हे त्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीनं समजावून सांगितलं. शेतीचं खरंखुरं अर्थशास्त्र मांडलं.

पंतप्रधान व्ही.पी. सिंग जोशींचे मित्र होते. जोशींनी राज्यसभेचं खासदार व्हावं अशी त्यांची इच्छा होती. जोशींनी मात्र त्या खासदारकीसाठी प्रकाश आंबेडकरांचं नाव सुचवलं. आंबेडकर खासदार झाले; पण त्यांनी आपलं नाव शरद जोशींनी सुचवलं होतं असं कधीही म्हटलं नाही. देशाचं पंतप्रधानपद मिळवण्याची पात्रता असलेला हा माणूस. त्यांच्या सभेला वक्ते म्हणून उपस्थित असलेले अटलजी, चरण सिंग, चंद्रशेखर, व्ही.पी. सिंग पुढे पंतप्रधान झाले. महाराष्ट्रातल्या चार माणसांमध्ये ही क्षमता असूनही ज्यांना ते पद मिळालं नाही त्यातले सगळ्यात उपेक्षित शरद जोशी.

हा माणूस योद्धा होता. दणकट होता. त्यानं बावीस वेळा शेतकऱ्यांसाठी तुरुंगवास भोगला. तब्येतीकडं दुर्लक्ष करून एस.टी.च्या लाल डब्यातून प्रवास करीत दहा हजार सभा गाजवल्या. १६ पुस्तकं लिहिली. शेकडो कार्यकर्त्यांना नाव मिळवून दिलं. शरद जोशींवर शेकडो केसेस दाखल झालेल्या होत्या. शरद जोशी अफाट प्रतिभेचे नेते होते. तुफान वक्ते होते. ते फटकळ, काहीसे उद्धट, महत्त्वाकांक्षी आणि कोरड्या स्वभावाचे होते. आपल्या नशिबी श्रेयहीनताच लिहिलेली आहे याची पूर्वकल्पना असूनही ते अविरतपणे लढत राहिले. कोट्यावधी रुपये कमावण्याची क्षमता अंगी असलेल्या या माणसानं अनेकदा खिसा खाली असल्यानं कार्यकर्ते, मित्र यांच्याकडून मिळालेल्या शेसव्वासे रुपय्यावर गुजराण केली. त्यांचे हे हलाखीचे दिवस वाचताना डोळे पाणावतात. त्यांच्या पत्नीनं आत्महत्या केली. दोन्ही मुली परदेशात गेल्या. तिकडेच स्थायिक झाल्या. एकटा पडलेला हा योद्धा आयुष्यभर शेतकऱ्यांसाठी एकाकी झुंजत राहिला. आपल्या जवळच्या नातेवाइकांनीसुद्धा आपल्याला एक वाया गेलेला मुलगा म्हणून हिणवावं याचं त्यांना वाईट वाटायचं.

मी त्यांना अनेकदा भेटलो होतो. त्यातल्या दोन प्रदीर्घ भेटी तर कायमच लक्षात राहिल्या. चाकणला रोटरी क्लबतर्फे माझं महात्मा फुल्यांवर भाषण होतं. त्या वेळेला शरद जोशी राष्ट्रीय पातळीवरचे नेते असूनही ते श्रोत्यांमध्ये येऊन बसले होते.

श्रोत्यांमध्ये त्यांना बसलेलं बघून मला भाषण करताना खूप टेन्शन आलेलं होतं. भाषण संपल्यावर ते स्टेजवर आले. त्यांनी पाठीवर थाप मारून मला दाद दिली. ध्रुवशेट कानपिळे यांच्याकडं बसून आम्ही तासभर गप्पा मारल्या. आम्ही एकत्र जेवण केलं.

दुसरा प्रसंग एस.एम. जोशी वारले तेव्हा त्यांच्या अंत्ययात्रेला शरद जोशी आले होते. तिथे गोविंद तळवलकरही आलेले होते. दोघांमधून विस्तवही जात नव्हता. गोविंदरावांनी म.टा.मधून जोशींची कायमच सालटं काढलेली होती. त्या अंत्ययात्रेत साने गुरुजी स्मारक, सारसबाग, टिळकरोड ते वैकुंठ स्मशानभूमी असा सुमारे तासाभराचा पायी प्रवास करताना माझ्या खांद्यावर हात टाकून जोशीसर मला असंख्य गोष्टी सांगत होते. शरद जोशींचं सारंच आयुष्य हे चमत्कार वाटावा असं मौलिक आणि गूढ होतं. त्यांच्या कार्याचं, स्वभावाचं, योगदानाचं अतिशय साक्षेपी चित्रण करणारा ग्रंथ प्रसिद्ध लेखक, संपादक श्री. भानू काळे यांनी लिहिला आहे. हा ५३४ पृष्ठांचा अतिशय मौलिक ग्रंथ आहे. तो पुण्याच्या ऊर्मी प्रकाशनानं अवघ्या ५०० रुपयांना दिलेला आहे. मराठीमध्ये गेल्या अनेक वर्षात असा महाग्रंथ लिहिला गेला नव्हता. या चरित्र ग्रंथासाठी काळे यांनी आपल्या आयुष्यातील दहापेक्षा जास्त वर्षे अभ्यासात घालवली. साधनं जमवण्यासाठी, जोशींच्या सहकारी, मित्र, कार्यकर्त्यांना भेटण्यासाठी काळे देशविदेशात गेले. शेकडो ग्रंथ, हजारो लेख आणि अक्षरश: लाखो दस्तावेज त्यांनी धुंडाळले.

हे पुस्तक एकदा हातात घेतलं की वाचून पूर्ण होईपर्यंत खाली ठेवता येत नाही. शरद जोशी हा अफाट माणूस समजावून घ्यायचा असेल तर हे पुस्तक वाचायलाच हवं. विशेष म्हणजे ही जोशींची केवळ विभूतिपूजा नसून अतिशय साक्षेपानं चरित्र नायकाच्या गुणदोषांचा धांडोळा घेणारा हा ग्रंथ झालेला आहे. अनेक घटना वाचकांपुढं प्रथमच आणणारा हा ग्रंथ म्हणजे चाकण ते स्वित्झर्लंडपर्यंत शेकडो जणांना भेटून केलेलं एका दैदिप्यमान कालखंडाचं अपूर्व दस्तावेजीकरण होय.

अतिशय वाचनीय, प्रभावी आणि मौलिक ग्रंथ लिहून भानू काळे या व्यासंगी लेखकानं भारतीय भाषांमधला गेल्या दोन दशकातला सगळ्यात महत्त्वाचा संदर्भग्रंथ आपल्याला दिलेला आहे. शिक्षणयात्रा, व्यावसायिक जगात, डोंगरकुशीतल्या नंदनवनात, मातीत पाय रोवताना, उसाचे रणकंदन, धुमसता तंबाखू, पांढरे सोने, लाल कापूस, शेतकरी संघटना : तत्त्वज्ञान आणि उभारणी, अटकेपार, किसानांच्या बाया आम्ही, राजकारणाच्या पटावर, राष्ट्रीय मंचावर जाताना, सहकारी आणि टीकाकार, अंगाराकडून ज्योतीकडे : शोध नव्या दिशांचा, साहित्य आणि विचार, सांजपर्व अशी १७ प्रकरणं आणि ५ परिशिष्टं असलेला हा ग्रंथ आहे. हे पुस्तक वाचून खूपं अस्वस्थता आली. असा नेता आणि असा चरित्रग्रंथ हे मानवतेची श्रीमंती वाढवतात. आजच्या समकालीन जगण्याला ऐतिहासिक मोल प्राप्त करून देणारा हा योद्धा पुरूष मध्यमवर्गियांच्या कायम हेटाळणीचा विषय राहिलेला आहे.

आजपर्यंतच्या इतिहासाची खरी प्रेरणा ही शेतीमध्ये होणारा गुणाकार लुटण्याची आहे असं रोखठोक सत्य सांगणाऱ्या शरद जोशींची आपण कायम उपेक्षाच केली, आता या ग्रंथाचीही उपेक्षाच करणार का?

**– प्रा. हरी नरके**

अंगारवाटा... शोध शरद जोशींचा
लेखक : भानू काळे, ऊर्मी प्रकाशन,पुणे,
१२ डिसेंबर, २०१६, पृष्ठे ५१०+ २४ आर्टप्लेट्स,
किंमत ५०० रुपये
पुस्तकासाठी संपर्क :- प्रा.सुरेशचंद्र म्हात्रे, शेतकरी संघटना
अंगारमळा, आंबेठाण, ता.खेड, जि.पुणे - ४१० ५०१,
फोन. ९८२२३ ००३४८,
अनंतराव देशपांडे, ८६६८३ २६९६२, ९४०३५ ४१८४१
लेखकाचा संपर्क :- bhanukalegmail.com

♦ ♦ ♦

# शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष घनवट यांच्यावर दरोड्याचा गुन्हा

**श्रीगोंदा (प्रतिनिधी) –** श्रीगोंदा तालुक्यात विविध ठिकाणी शेतकरी संपात सहभागी होऊन आंदोलने करण्यात आली. शहरातील शनिचौक येथील आंदोलनानंतर शहरातील फळ दुकानदार आणि शेतीसंबंधी वस्तू विक्रेते यांचे दुकान बंद करताना बसस्थानकावरील शुभम मुनोत यांच्या दुकानात बळजबरीने घुसून शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल घनवट यांनी आणि इतर पंधरा जणांनी घुसून दुकानातील दूध पिशव्या फेकून देऊन दुकानातील रोख रक्कम आणि इतर मालाचे नुकसान केल्याने अनिल घनवट यांच्यासह इतरावर दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शुभम संजय मुनोत यांचे बसस्थानकवर आइस्क्रीम, दुग्धजन्य पदार्थ विक्री दुकान आहे. शेतकरी संघटनेचे आंदोलन सुरु असताना बस स्थानक परिसरात हे आंदोलक गेले असताना या दुकानात दूध विक्री होत असल्याच्या कारणातून या दुकानातील कृष्णाई दुधाच्या पिशव्या आंदोलकानी फेकून देत २००० रुपये किमतीचे दुग्धजन्य पदार्थांची फेकाफेक केली व २००० रुपये घेऊन गेले. याबाबत शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल घनवट, शांताराम पोटे, संदीप खामकर, दैवत जाधव, अम्बादास मखरे, यशवंत पोटे, सतीश कन्हेरकर, संदीप मखरे, संतोष मखरे आदींवर भावि कलम ३९५, ३२३, ४२७, १४३, १४७, ५०४, ५०६ प्रमाणे दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

♦ ♦ ♦

# कर्जमाफीचा निर्णय, योजनेचा तपशील व निकष

राज्यातील सुमारे ८९ लाख शेतकऱ्यांना ३४ हजार २२ कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या विशेष बैठकीत कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. दिनांक १ एप्रिल २०१२ ते ३० जून २०१६ या कालावधीत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना दीड लाख रुपयेपर्यंतचे कर्ज सरसकट माफ करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. राज्यातील सुमारे ४० लाख शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणारी ही कर्जमाफी छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजना म्हणून ओळखली जाणार आहे. या योजनेचा जी आर आता सरकारने जारी केला आहे.

२०१३-१४ आणि २०१४-१५ या वर्षात राज्यातील दुष्काळ आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं होतं. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानामुळे अनेक शेतकरी पीक कर्जाची मुदतीत परतफेड करू शकले नाहीत. परिणामी हे शेतकरी थकबाकीदार राहिल्यामुळे त्यांना नवं पीककर्ज घेण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

या निर्णयानुसार मुद्दल व व्याजासह दीड लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता योजना (One Time Settlement) म्हणून ३० जून २०१६ रोजी थकबाकी कर्जापैकी सरकारकडून दीड लाख रुपये देण्यात येणार आहेत. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या कर्जाची संपूर्ण रक्कम बँकेत जमा केल्यावर सरकारकडून दीड लाख लाभाची रक्कम शेतकऱ्यांना दिली जाईल.

२०१५-१६ या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाची ३० जून २०१६ पर्यंत पूर्णत: परतफेड केल्यास, शेतकऱ्यांना २०१५-१६ मध्ये पूर्णत: परतफेड केलेल्या पीक कर्जाच्या २५% किंवा २५,००० रुपयांपर्यंत जी कमी असेल ती रक्कम देण्यात येईल. मात्र ही रक्कम किमान पंधरा हजार रुपये इतकी असेल. मात्र, शेतकऱ्यांनी परतफेड केलेली रक्कम पंधरा हजार रुपयांपेक्षा कमी असल्यास संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येईल.

सन २०१२-१३ ते २०१५-१६ या वर्षात कर्जाचं पुर्नगठन केलेल्या शेतकऱ्यांपैकी, जे शेतकरी ३० जून २०१६ पर्यंत थकबाकीदार असतील, त्यांना या योजनेचा लाभ देण्यात येईल. मात्र, जे थकीत नाहीत त्यांना २५ हजार रुपये देण्यात करण्यात येणार आहेत. राज्यातील ८९ लाख शेतकऱ्यांना या लाभ होणार असून, त्यासाठी अंदाजे ३४ हजार २२ कोटी खर्चाच्या तरतुदीला सरकारने मान्यता दिली आहे.

**कर्जमाफीसाठी निश्चित केलेले निकष**

१) या योजनेअंतर्गत कर्जमाफी आणि इतर प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी शेतकरी कुटुंब हा निकष विचारात घेण्यात येणार आहे. 'कुटुंब' या व्याख्येत पती, पत्नी आणि अठरा वर्षाखालील मुलांचा समावेश आहे.

२) पात्र शेतकरी कुटुंबातील कर्जमाफीच्या देय रकमेत कुटुंबातील कर्जदार शेतकरी महिला असल्यास त्यांच्या कर्जाच्या रकमेचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

३) या योजनेसाठी केवळ राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांनी शेतकऱ्यांना दिलेले शेती कर्ज यात पीक कर्ज आणि मध्यम मुदत कर्ज यांचा समावेश आहे.

४) खरीप हंगामासाठी सरकारी हमीवर देण्यात येणाऱ्या दहा हजार रुपयांच्या कर्जाची रक्कम शेतकऱ्याला मिळणाऱ्या कर्जमाफीतून वजा करण्यात येईल.

**कर्जमाफीसाठी या व्यक्ती अपात्र :**

१) राज्यातील आजी-माजी मंत्री, राज्यमंत्री, आजी-माजी खासदार, आजी-माजी आमदार

२) जिल्हा परिषद, महापालिका सदस्य

३) केंद्र-राज्य सरकारी अधिकारी, कर्मचारी, निमशासकीय संस्थांचे सर्व अधिकारी, कर्मचारी, केंद्र-राज्य शासन अनुदानित संस्थांचे सर्व अधिकारी, कर्मचारी (चतुर्थ श्रेणी वगळून)

४) शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती

५) निवृत्तिवेतन धारक ज्यांचे मासिक निवृत्तिवेतन पंधरा हजारांपेक्षा अधिक आहे. (माजी सैनिक वगळून)

६) कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकारी साखर कारखाना, सहकारी सूतगिरणी, नागरी सहकारी संस्था, जिल्हा बँका, सहकारी दूध संघ यांचे अधिकारी, पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष) आणि मजूर सहकारी संस्थेचे अध्यक्ष

७) ३ लाख रुपयांपेक्षा जास्त ढोबळ उत्पन्न असलेली सेवा कर भरण्यासाठी नोंदणीकृत व्यक्ती.

८) जी व्यक्ती मूल्यवर्धित कर किंवा सेवा कर कायद्याअंतर्गत नोंदणीकृत आहे, तसंच ज्याची २०१६-१७ मधील वार्षिक उलाढाल १० लाख किंवा अधिक आहे.

♦ ♦ ♦

# महाराष्ट्र शासनाची कर्जमुक्तीची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची फसवणूक!



महाराष्ट्र शासनाने केलेली शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांची घोर फसवणूक असून, शरद जोशी प्रणीत शेतकरी संघटना या कर्जमुक्तीचा निषेध करत असल्याचे निवेदन आज शेतकरी संघटनेने येवल्याचे तहसीलदार बहिरम यांना प्रत्यक्ष भेटून दिले.

निवेदनात शेतकरी संघटनेने असे सांगितले की, शेतकरी संपाने महाराष्ट्रात आंदोलन पेटले, सरकारची झोप उडाली. शहरात येणारा भाजी पाला, दूध यांचा पुरवठा बंद झाला. गावोगाव रस्ता रोको आंदोलना मुळे परिस्थिती हाताबाहेर जात असताना यावर उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने विविध शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंत्रीगटाची चर्चा घडवून आणली. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा, सरसकट कर्जमुक्ती करत असल्याची घोषणा शेतकरी नेते आणि मंत्री गटाचे मुख्य नेते चंद्रकांतदादा पाटील यानी संयुक्त पत्रकार परिषदेत केली. आणि मागण्या मान्य झाल्या म्हणून आंदोलन स्थगित करण्याची घाईघाईत विनंती केली.

आंदोलन शांत झाल्यावर मात्र सुकाणू समिती ऐकत नाही म्हणून त्यांना डावलून, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना या पक्षाच्या प्रमुख नेत्यांच्या भेटी घेऊन दीड लाख रुपयांची कर्जमाफी सरसकट न देता जून २०१६ पर्यंत थकित शेतकऱ्यांना लाभ मिळणार, २०१२ ते २०१६ या काळातील थकित शेतकरी या सर्व अटीनुसार एक गावातील सोसायटीत दहा ते वीस शेतकऱ्यांना लाभ मिळणार हीच का सरसकट कर्जमुक्ती आणि असा होतो का सातबारा कोरा? असा प्रश्न या निवेदनात शेतकरी संघटनेने विचारला असून शेतकर्यांतची फसवणूक थांबवून शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती द्यावी, शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव मिळण्यासाठी आयात निर्यात धोरणात सातत्य ठेवावे. अशी मागणी करण्यात आली.

शहरातील लोकांसाठी शेतमालाचे भाव पाडू नये शासनाने शेतमाल खरेदी करून भले त्यांना फुकट वाटावा,

सलग तीनवर्ष दुष्काळी परिस्थिती असताना वीजबील आकारणी झाली आहे ती रद्द करून बिल द्यावे कारण बिल भरले नसले तरी सदर रक्कम शेतकऱ्यांच्या नावे टाकून ठेवली आहे. तक्रार घेऊन गेल्यावर बिल भरा नंतर बघू असे उत्तर मिळते. वापर किती याचा कुठलाही ताळमेळ नाही याचा विचार शासनाने करावा आणि जेवढा वापर असेल तेवढेच बिल आकारावे याकडे ही शेतकरी संघटनेने शासनाने लक्ष वेधले.

या प्रसंगी शेतकरी संघटनेचे उत्तर महाराष्ट्र प्रमुख संतु पाटील झांबरे,महिला आघाडीच्या उत्तर महाराष्ट्र प्रमुख सौ संध्या पगारे, येवला तालुका अध्यक्ष अरुण जाधव, अनिस पटेल, सुभाष सोनवणे, सुरेश जेजूरकर, जाफरभाई पठाण, शिवाजी वाघ, ज्ञानेश्वर जगझाप, प्रभाकर भोसले, ॲड.भुले,बापुराव पगारे, रामराव गिडगे,दीपक देवरे, रवींद्र तळेकर, सदाशिव शिंदे सह शेतकरी उपस्थित होते. या निवेदनाच्या प्रती उपविभागीय अधिकारी येवला, सहाय्यक निबंधक येवला यांना देण्यात आल्या आहेत.

♦ ♦ ♦

*तिफन थांबवुन विचार करतो आहे मी*
*पेरू की खावू हे दाणे? काय करू?*

**– वैभव देशमुख**

♦ ♦ ♦

*बघा बघा हो, करुन गेले खते बियाणे खिसा रिकामा;*
*कसा करावा दुबार पेरा, जिवास चिंता मला विठोबा....*

**– श्यामनाथ पारस्कर**

# ये तू मैदानात : शेतकरी गीत

ये तू मैदानात, ये तू मैदानात
ये तू मैदानात, पाईका ये तू मैदानात
काळ्या आईचा एल्गार
बिगूल फुंकण्या हो तय्यार
उलवून फेकू गुलाम बेड्या
जगण्या स्वातंत्र्यात
जगण्या स्वातंत्र्यात, जगण्या स्वातंत्र्यात
जगण्या स्वातंत्र्यात, पाईका ये तू मैदानात ।।धृ।।

गोरे गेले, काळे आले
शस्त्राचे रंगांतर झाले
काळी आई खितपत पडली
विझल्या अंधारात
विझल्या अंधारात, विझल्या अंधारात
विझल्या अंधारात तेवण्या, ये तू मैदानात
ये तू मैदानात, तेवण्या ये तू मैदानात ।।१।।

झोन बंदी, निर्यातबंदी
साठेबंदी, प्रदेशबंदी
आयातीचा दोर खेचतो
कंठाचा गळफास
कंठाचा गळफास, कंठाचा गळफास
कंठाचा गळफास सोडण्या, ये तू मैदानात
ये तू मैदानात, सोडण्या ये तू मैदानात ।।२।।

हात बांधती, पाय बांधती
डोळ्यावरती टाय बांधती
आणिक म्हणती स्पर्धा कर तू
विद्वानांची जात
विद्वानांची जात, ती' विद्वानांची जात
ती' विद्वानांची जात ठेचण्या, ये तू मैदानात
ये तू मैदानात, ठेचण्या ये तू मैदानात ।।३।।

शेतीला गिळणार कायदे
हिरवळीला पिळणार वायदे
सुगीशिखरावर श्वापदं झाली
नांगी रोवून स्वार
नांगी रोवून स्वार, नांगी रोवून स्वार
सरावलेली नांगी चेचण्या, ये तू मैदानात
ये तू मैदानात, चेचण्या ये तू मैदानात ।।४।।

रणकंदनाची हाळी आली
नीजप्रहरावर पहाट झाली
दे ललकारी अभय पाईका
हाती घेत मशाल
हाती घेत मशाल, हाती घेत मशाल
मशाल हाती घेत झुंजण्या, ये तू मैदानात
ये तू मैदानात झुंजण्या, ये तू मैदानात ।।५।।

**– गंगाधर मुटे अभय'**

हे काव्यफूल युगात्म्याच्या चरणी वाहून शेतकरी संघटनेला अर्पण करून दिलेल्या वचनमुक्तीतून उतराई होण्याचा प्रयत्न. संदर्भ ''हतबल झाली प्रतिभा''. baliraja.com/node/986

## सोनपेठ तालुक्यात वन्यप्राण्यांचा उपद्रव

**शेतकरी संघटनेने केली वन्य प्राण्यांच्या बंदोबस्त करण्याची मागणी**

तालुक्यात वन्यजीवन पिकांची मोठ्या प्रमाणात नासाडी करीत असून उभ्या पिकांचे नुकसान करणाऱ्या वन्यजीवांचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी संघटनेच्या वतीने तहसिलदार सोनपेठ यांच्याकडे करण्यात आली आहे. हरीण, रानडुकर व इतर वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत.

सोनपेठ तालुक्यातील नरवाडी, शेळगाव, सायखेडा, खडका, नेकोटा, कोठाळा, बोंदरगाव, आवलगाव, वडगाव, उखळी, लासीना, विटा यासह गोदाकाठ भागात हरणांचे प्रचंड मोठे कळप फिरत आहेत एका एका कळपात शंभरहून अधिक लहान मोठी हरणे आहेत. हे कळप शेतात शिरल्यावर संपूर्ण पीक संपल्यावरच बाहेर पडत आहेत. हे कळप मोठ्या संख्येने असल्यामुळे शेतकऱ्यांना शेताबाहेर हाकलणे अशक्य झाले आहे. या हरणांनी शेतकऱ्यांनी लावलेली संपूर्ण पिके उद्ध्वस्त केली आहे. शेतकऱ्यांना यामुळे दुबार पेरणी करावी लागणार आहे. हरणा प्रमाणेच रानडुक्करांनी ही शेतकऱ्यांना चिंताग्रस्त करीत आहेत. गेल्या महिन्यात नरवाडी येथे डुकराच्या हल्यात एका जणाला आपला जीव गमवावा लागला होता. एक शिक्षक रानडुकराच्या धडकेत गंभीर जखमीही झाला होता हे डुक्कर ही कळपाने शेतात घुसून उभ्या पिकांचे नुकसान करत आहेत. या वन्य प्राण्यांचा तात्काळ योग्य बंदोबस्त करण्याची मागणी शेतकरी संघटनेने एका निवेदनाद्वारे तहसीलदार सोनपेठ यांच्याकडे केली आहे या निवेदनावर सुधीर बिंदु, माधव जाधव, अण्णा जोगदंड, माऊली जोगदंड, गणेश पाटील, विश्वंभर गोरवे, पंडीत अण्णा भोसले, सोमनाथ नागुरे, देवीदास भुजबळ, भागवत बचाटे, माणिकराव कांबळे गुरुजी, माणिकराव काळे, दत्ता पवार, बबन मोहीते, रमेश मोकाशे आदीच्या सह्या आहेत.

♦ ♦ ♦

शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष गुणवंत पाटील हंगरगेकर यांच्या हंगरगाता मुखेड, जि. नांदेड या गावातील मा.खा. शरद जोशी साहेबांच्या खासदार निधीतून (३०लाख रु.) रस्त्याचे आणि (१० लाख रु.) लिलाताई जोशी सभागृहाचे उद्घाटन माजी आमदार श्री. वामनरावजी चटप यांचे हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी गुणवंत पाटील, मुखेडचे आमदार डॉ. तुषार राठोड, जालना जिल्हाध्यक्ष बाबूराव गोल्डे, डॉ. अप्पासाहेब कदम, जिल्हाध्यक्ष धोंडीबा पवार, रमेश पाटील हंगरगेकर, रामराव कदम, शिवाजी शिंदे आदी प्रामुख्याने हजर होते.





शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी पाच नवडगांव, पिरकल्याण, धानोरा, घोडेगाव येथील शेतकऱ्यांनी धरणे आंदोलन सुरु केले या आंदोलनाला वाढता पाठिंबा मिळत असून आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. गिताताई खांडेभराड पाटील यांनी दिला आहे. शासनाने लवकरात लवकर दखल घ्यावी अन्यथा रस्त्यावर यावे लागेल असा इशारा देण्यात आला आहे.

या संदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ता डॉ. कदम, सुधीर शिंदे, विनोद सुलताने, अनिल जोशी, सुनील चुंगडे, राम काळे, शिवाजी यांचे व्दारा शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

**कर्ज माफी योजनेच्या व्याप्तीत वाढीची मुख्यमंत्र्यांची घोषणा**

- कर्ज माफी योजनेत २००९ नंतरच्या थकित कर्जदारांचा समावेश
- नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ
- ओटीएस योजनेच्या लाभासाठी मुदतवाढ देणार



मुंबई : राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या ऐतिहासिक योजनेची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेतला असून २००९ नंतरच्या कर्जमाफी नंतरच्या कालावधीत कर्ज घेतलेल्या परंतु ३० जून २०१६ पर्यंत थकित राहिलेल्या शेतकऱ्यांचाही आता छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत समावेश करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

त्याचप्रमाणे नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेण्यासाठीची मुदत एक महिन्याने वाढवून ती ३१ जुलै २०१७ पर्यंत करण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. तसेच दीड लाखापेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या शेतकऱ्यांना एकरकमी परतफेड योजनेंतर्गत (ओटीएस) दीड लाखावरील रक्कम भरण्याचा निश्चित कालावधी शासन निर्णयात नमूद करण्यात आलेला नव्हता. त्यांना पैशाची उपलब्धता करण्यास पुरेसा वेळ मिळावा म्हणून अशा शेतकऱ्यांना दीड लाखावरील रक्कम भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार आहे.

# तूर खरेदीकरिता शेतकरी संघटनेचे ठिय्या आंदोलन

टोकण दिलेल्या शेतकऱ्यांची अद्यापही तूर खरेदी करण्यात आली नाही तर दुसरीकडे खुल्या बाजारात तुरीला कमी भाव मिळत आहे. अशा स्थितीत बाजार समितीच्या आवारात ७५ ट्रॉल्या मोजमापाच्या प्रतिक्षेत आहेत. त्याचाही भुर्दंड शेतकऱ्यांना पडत आहे. त्यामुळे शासनाने मुल्यनिर्धारण निधी अंतर्गत त्वरीत तूर खरेदी सुरू करावी, या मागणीकरिता शेतकरी संघटनेने आकोट उपविभागीय अधिकारी कार्यालयात ३ जुलै रोजी ठिय्या आंदोलन केले.





यावेळी शेतकरी संघटनेचे नेते ललित बहाळे, माजी जिल्हा प्रमुख सतिश देशमुख, तेल्हारा तालुका प्रमुख लक्ष्मीकांत कौठकर, आकोट तालुका प्रमुख प्रफुल बदरखे यांनी मार्गदर्शन केले. दरम्यान आमदार रणधीर सावरकर यांनी पणन मंत्री सुभाष देशमुख यांच्याशी चर्चा करून राहिलेली तूर खरेदी करण्याचे आश्वासन दिले.


या ठिय्या आंदोलनात विनायक मोहोकार, विठ्ठल बोंद्र, गोपाल काळे, रमेश नारे, प्रफुल पिंपळे, संजय पुंडकर, संजय वानखडे, चंद्रशेखर महाजन, इरफान निजामोद्दीन, संतोष आखरे, अमोल पटके, गोपाल घ्यारे, संतोष सोनटक्के, अमोल पोहरे, राहूल पोटे, व्ही.आर. काळमेघ, ओमप्रकाश पडोळे, विनोद नायसे, पद्माकर झापर्डे, नरेंद्र बेलोकर, प्रकाश काळंके, गोपाल डोके, जयकुमार धांडे, श्रीराम रघुवंशी, प्रशांत बोरोडे, कैलास हराळे, गिरिधर कराड, नितेश चौधरी, संदीप वानखडे, बाळासाहेब देवळे, विनोद मोहोकार, अभिजीत कात्रे, संदीप मोदे, भूषण घ्यारे, विजय वसू, कृष्णगोपाल डागा, राहुल धारकर, समीर देशमुख, राम डोबाळे, राम डोबाळे, संतोष डोबाळे, रुपेश पांडे, बापूराव वानखडे, जनार्दन साबळे, अवधूत बोके, सुमित घुटे व शेतकरी उपस्थित होते.

---

# तीन पिढ्यांच्या पुराव्याची अट रद्द करा - ॲड. वामनराव चटप यांची पंतप्रधानाकडे मागणी

केंद्र सरकारने वनजमिनीवरील मालकी हक्क प्रस्थापिक करण्यासाठी २००६ आणि २००८ च्या कायद्यात घातलेली तीन पिढ्याच्या पुराव्याची अट रद्द करण्यात आली आहे. आदिवासी व बिगर आदिवासी शेतकऱ्यांना अशक्यप्राय असणारा ८५ वर्षाचा पुरावा मागणे हा त्याचे न्याय हक्क नाकारण्याचा प्रकार आहे. त्यामुळे या कायद्यात सुधारणा करावी, अशी मागणी शेतकरी संघटनेचे नेते माजी आ. ॲड. वामनराव चटप यांनी पंतप्रधानासह केंद्रीय आदिवासी व समाजकल्याण मंत्री आणि पर्यावरण मंत्र्याकडे केली आहे.

केंद्र सरकारने २००६ मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी वनहक्क मान्यता अधिनियम पारीत केला. या अधिनियमातील कलम २ (ण) मधील इतर पारंपरिक वननिवासी या शब्दाच्या व्याख्येत तीन पिढ्यांच्या पुराव्याची अट सामील करण्यात आली आहे. तसेच पिढी या शब्दाचा अर्थ २५ वर्षांचा कालखंड असे नमूद आहे. या व्याख्येत १३ डिसेंबर २००५ पूर्वी तीन पिढ्यांपासून मुख्यत्वे करून वनात राहणारा आणि उपजीविकेच्या खऱ्या-खुऱ्या गरजांसाठी वनावर किंवा वनजमिनीवर अवलंबून असणारा कोणताही सदस्य अथवा समाज असा आहे. सदर अंतिम अधिसूचना १ जानेवारी २००८ ला भारत सरकारच्या जमाती कार्य मंत्रालयाने काढली आहे.



प्रत्यक्षात भारतीय वन कायदा १९२७ हा गोऱ्या इंग्रजांच्या काळातील आहे. भारत सरकारने १९८० साली वनसंरक्षण कायदा पारीत केला. ३५ वर्षे लोटल्या गेलेला हा कायदा करताना वनजमिनीवरील जबरानजोत शेतकऱ्यांची २५ वर्षांची एक पिढी धरणारी ही व्याख्या करून तीन पिढ्यांचा पुरावा मागितला आहे. या व्याख्येनुसार तीन पिढ्या मोजल्या तर ७५ वर्षाचा काळ होतो. त्यात आजमितीचा काळ म्हणजे दहा वर्षे धरले तर ८५ वर्षांचा पुरावा द्यावा लागणार आहे. हा पुरावा मिळणे अशक्य असून, देशात व राज्यात ग्रामपंचायतींची स्थापना १९५९ नंतर झाली आहे. देशाचे संविधान लागू होवून केवळ ६५ वर्षे झाली आहे. त्यामुळे ७५ वर्षांचा पुरावा मागणे एकप्रकारे शेतकऱ्यांना पट्टे नाकारण्याचा प्रकार आहे. तीन पिढ्यांची अट कालबाह्य ठरत असताना याचा हट्ट शासनाने न करता ती अटच रद्द करावी, अशी मागणी चटप यांनी निवेदनातून केली आहे.

# शेतकऱ्यांचा संप की शेतकरी आंदोलन?










# अंगारमळा

FROM :
ANGARMALA
At/Po Arvi Chhoti
Tah-Hinganghat
Dist-Wardha (m.s)

TO,

